# कुणालाच काही न कळण्याच्या बधीर जगात

-- चं. प्र. देशपांडे.

निरनिराळ्या विषयांवर गप्पा, चर्चा यांसाठी फेसबुक हा एक चांगला कट्टा उपलब्ध आहे. इथे सहज अनेकांशी भेटी होऊ शकतात आणि आपले मित्र वारंवार विचार, विनोद, किस्से यांची देवाणघेवाण करू शकतात. गेले काही महिने मी या सोयीचा लाभ घेत आलो आहे. या गप्पा-चर्चांचा एक लेख करावा असा विचार आला, परंतु, नावानिशी इतरांची मते लेखात घेणे हे नियमाला वा कायद्याला वा नीतीला धरून आहे की नाही हे माहीत नसल्याने फक्त माझ्याच ओळींचा लेख केला आहे. एका एका विषयाचे तुकडे स्वतंत्रपणे दिलेले आहेत.

एका मित्राने दिलेल्या ओळी -- माझ्या ओठावरी थरथरे, प्रार्थना एक हीच<br>
व्हावे माझ्या कधी न भगवन, हातुनी कर्म नीच<br>
- पू. साने गुरुजी.

कुणाच्याच हातून नीच कर्म होऊ नये अशी जर ही प्रार्थना असती तर किती फरक पडला असता ! स्वतःची अलगता घट्ट बाळगणे हाच तर माणसाचा प्रॉब्लेम आहे ! की बाकी सगळे चांगले असून नीच कर्माची शक्यता असलेला फक्त मीच आहे, अशी ही नम्रता म्हणावी ? स्वतःची अलगता अटळ असेल तर नीच कर्महो अटळच नाही का ?

सकारात्मक अलगता हे वदतो व्याघाताचे प्रचंड उदाहरण असल्यामुळेच माणसाची वाट लागत चाललेली आहे. तथाकथित पुरोगामी, उदारमतवादी, सहिष्णू, सगळेच या प्रश्नाने ग्रासलेले दिसतात. धर्मांमुळे, विचारसरणींमुळे वगैरे निर्माण होणारी तेढ, हिंसा पाहून हे लक्षात यावे. अलगता हीच हिंसात्मक असेल तर अलगता बाळगून अहिंसक कसे जगणार ?

सगळे सारखे काहीतरी साजरे करत, उड्या मारत,करमणूकप्रधान हिंडत असतात. आपल्याला भुक्कड विनोदी, उथळ, सवयीतली, डल कला पुरे, असे ठरलेले दिसते. अशा लोकांचे हे साहित्यसंमेलन ! ते ग्लॅमरस होणे अटळ आहे ! याचे अध्यक्षपद म्हणजे सन्मान वगैरे काही नाही. एरवी मृतात्म्यांना फुले वाहिली जातात, हे मृतात्म्यांकडून हारगुच्छ मिळणे !

सर्जकता परिस्थितीवर अवलंबून नसते, परंतु, आपण परिस्थितीने गांजलेले, दुःखाने गंजलेले, ताणतणावग्रस्त, रोजच्या व्यापतापांनी वैतागलेले, कंटाळलेले लोक असून आपल्या डोक्याला कुठल्याही सर्जकतेचा ताप झेपणार नाही, अशी समजूत करून देण्यात आलेला आणि ती समजूत स्वीकारलेला आपला समाज आहे. सर्जकता हे श्रीमंत, खुशालचेंडू, व्यापतापहीन लोकांचे क्षेत्र असते असा समज दिसतो.

एक क्षण तरी<br>
काहीही न करण्याचा जिवंत<br>
कर्मत्यागयोग<br>
घडावा

तसे नाही ! सतत ऑक्युपाईड राहण्याचा रोग नको या अर्थी !

आपली बाजू शाबीत करण्याचा वा बदला घेण्याचा विचार चालू असेपर्यंत, झालेल्या अपमानाच्या दुःखातून बाहेर पडता येत नाही, दोन्हींतून एकदमच बाहेर पडावे लागते.

तंत्रज्ञान जुने होण्याबद्दल --
हे असे पटापट सगळे नापास होत गेले तर अवघड आहे ! आधी लिहिलेलेच पुन्हापुन्हा करत बसायचे तर नवे लिहायचे कधी !? की एकूणच हा सगळा नाशवंत माल आहे म्हणून विषय सोडूनच द्यावा ?
प्रत्येक लेखकाला चांगले वाचता येतेच असे नाही. अर्थ समजून वाचू शकणारी माणसे दुर्लभ होत चालली आहेत. नाटकाप्रमाणेच, अर्थनिश्चिती आणि अनेकार्थता हेही प्रश्न येतील.
लिखित स्वरूपापासून संहिता ढळल्या की मोठ्या प्रमाणावर सत्यापलाप होणार नाही का ?
पेपरमाध्यमातले जतन करण्यासाठी इले. माध्यमाचा उपयोग होतो, असेही वाचनात येते.

आपणच फक्त शहाणे आहोत या भ्रमात जगणे किंवा डोक्याच्या चिंध्या करून, भरकटून मॅड होणे या दोन्हींतूनच त्यांना निवड करावी लागते. ते विश्लेषणवादी असतात.

Language is thought and thought is useful, but, thought is not all, it has to be limited. -- या निमित्ताने तुमच्याशी संपर्क ! तुमचे जबरदस्त काम मला माहीत आहे. ' अभिधानंतर ' चे महत्त्वाचे अंक माझ्या संग्रही आहेत. इथे भेटी होत राहतीलच.

सर्जकतेत सवयीच्या जगण्याचा मृत्यू घडतो, त्यामुळेच गरज नसल्याचे कारण सांगत लोक भीतीने तिला टाळतात, मग सवयीचे जगणे कितीही भयग्रस्त का असेना !

मनाचे व्यापार समजून घ्यायला हवेतच अशी अर्जन्सी वाटावी असे आयुष्यात फारसे काही घडलेच नाही समजा, तर --
The people to whom nothing has happened cannot understand the insignificance of events. - T. S. Eliot in ' The Murder In The Cathedral ' . घडणे आणि निरर्थकता !
जगण्याच्या ओघात हे वाक्य आठवले आणि मित्रांशी शेअर करावे असे वाटले -- बिनचूकपणाची फारशी काळजी न करता ! फारच काही चुकले असेल तर एलिअटचे नाव काढून तिथे माझे नाव टाकावे, ही नम्र विनंती !

समजमय भान टाळू इच्छिणारे संघर्षमय मनच महान संगीताचा बौद्धिक अर्थ विचारते.

भाषेची सूक्ष्मार्थता, अनेकार्थता, अर्थसमृद्धी, अचूकार्थता हे सर्व नाकारले जात असून साळढाळपणाकडे कल दिसतो. याने भाषा कमकुवत होत जाईल. विचारक्रिया ही भाषेवर अवलंबून असल्याने तीही कमकुवत होईल. याचे काय काय परिणाम होतील ? आपण ढ ( डल ) होत जाऊ ?

उत्तर-आधुनिकतेच्या आधीपासूनच्या भाषाभ्यासात आधी अर्थ आणि मग भाषा असे नाही. दोन्ही एकत्रच. अलिकडे भाषा म्हणजे नगण्य असे होत असल्यामुळे इथले मूळ वाक्य जरा सैलसर दिले आहे.
भाषा आणि अर्थ एकत्र येणे हे विचारक्रियेच्या क्षेत्रातलेच म्हणता येईल, पण यामागेही, तुम्ही म्हणता तशी काही चेतना असेल. याचे बौद्धिक स्पष्टीकरण मला माहीत नाही.

व्यक्तिमत्वाचे जोखड करणारी विचारक्रिया नसेल पण विचाराची उपयुक्तता चालू राहील, असे जे. कृष्णमूर्ती म्हणतात. कमावले गेलेले ज्ञान टाकून द्यावे, असे तेही म्हणत नाहीत. याचा सध्या अर्थ असा दिसतो की भाषा आणि विचार यांची कितपत गरज आहे, याचा पारा उतरत चालला आहे, तो कुठेतरी स्थिर होईल. त्यामुळे, कदाचित, ' अमृतानुभव ' वगैरे जे वाङ्मय आपण अक्षर म्हणत आलो, त्याचा एक प्रकारे हा असा मृत्यू होईल. लोककला टिकवतो म्हणून जशा त्या टिकत नाहीत तसाच हा प्रकार ! उपयुक्ततेसाठी विचारशक्ती किती लागेल हे आपोआप ठरेल, शांत राहा -- हा याचा सारांश  दिसतो.

सलील वाघ यांची एक कविता आहे, ' रद्दी ' या नावाची. पहिल्या सोळा ओळींत कवी त्याच्याकडे असलेल्या पुस्तकांची, अहवालांची, मासिकांची वगैरे यादी देतो. जबरदस्त दर्जेदार ! त्यांतले शेवटचे पुस्तक आहे ' रिडल ऑफ रॅशनॅलिझम -- सलील वाघ '. त्या कवितेच्या शेवटच्या पाच ओळी अशा आहेत ः --

पेपर पाच रुपे किलो
मासिकं साडेतीन रुपे किलो
पुस्तकं दोन रुपे पन्नास पैसे

माला जाळायला चंदनाची लाकडं नको
यवढी रद्दी पुरे

याचा या एकूण विचारात वा विचारावर काही प्रकाश पडेल काय, असा एक विचार आला  खरा !

नथिंगनेसपेक्षा इल्यूजन बरा, काफ्कापेक्षा नेमाडे बरे आणि पिरांदेल्लोपेक्षा तेंडुलकर बरे ! अशक्य शांततेपेक्षा अराजक बरे, नकारापेक्षा गोंधळ बरा आणि शोध घेण्यापेक्षा बुद्धिप्रामाण्यवादी निराशावाद बरा ! कुणालाच काही न कळण्याच्या बधीर जगात थोडी बुद्धी कमावून शहाणे तरी ठरता येते ! आपण मानवी जगणे आमूलाग्र बदलण्याच्या प्रयत्नात आहोत या भ्रमात राहता येते ! उपरोध म्हणून नव्हे, खरोखर ! भ्रम निदान असतो तरी, सत्य

कुठे असते ? असलेला भ्रम आणि नसलेले दरवाजे यांतला फरक शोधायला हवा ! पण, सत्य असे काही असूच शकत नाही, असे ठरवूनच टाकता येत असेल तर हा तरी शोध कशाला ? हाही उपरोधिक नव्हे, खरा प्रश्न ! एकूणात सारांश असा दिसतो की प्रश्नांचीही गरज नाही !

त्या लायनीत म्हणायचे झाल्यास आरती प्रभूंपेक्षा दिलीप चित्रे बरे, असे म्हणता येईल. मी दिलेल्या सगळ्या जोड्यांत मी जे बरे म्हटले आहे ते खरे तर ग्रेट नसलेले आणि आधीचे ग्रेट असलेले असे आहे. आधुनिकतेतल्या बुद्धिगौरवाच्या मनःस्थितीतून आपण बाहेर आलेलो नाही, असे मला सुचवायचे आहे. पिरांदेल्लोला मी ग्रेट नाटककार मानतो, तेंडुलकरांना नाही.

उत्तरआधुनिकतेचे प्रश्न आधीच्या बुद्धिगौरवामुळे तयार झाले. सगळे काही विचाराच्या कवेत येऊ शकते हा भ्रम. या भ्रमामुळेच उपपत्तींची शकले पडली आणि उपपत्तीचा मृत्यू जाहीर करावा लागला. सत्य असे काही नसतेच असे म्हणायची वेळ आली. प्रत्येकाचे सत्य वेगळे म्हणजेच भ्रम वेगळे. नथिंगनेसचा आशय तुकारामाच्याही अनेक अभंगांत आहे, पण बुद्धिगौरववाल्यांना तिकडे दुर्लक्ष करावे लागते. प्रत्येकाने आपापल्या मनाने रंगवलेले आणि ‘ बंद ‘ असलेले दार ठोठावणे हे भ्रामक असते, असा मूळ वाक्याचा अर्थ असावा.

मित्रमैत्रिणींनो, पुतळे जाऊं देत, आपण स्वतः कशाकशाशी आयडेंटिफाईड आहोत आणि त्यांतले कायकाय महत्त्वाचे आहे, असाही प्रश्न समोर घेतला तर ? हल्ली, पुरोगाम्यांत, असा प्रश्न चालतो का, तुम्हीच सांगा !

भाषेच्या संस्काराने माणसाचा स्वभाव, कार्यशक्ती वगैरे ठरते, अशा स्वरूपाच्या वाक्यावर --
म्हणजे मराठी माणसाच्या पीछेहाटीला मराठी भाषाच कारणीभूत असू शकते ! मराठी भाषा टाकल्याशिवाय मराठी माणसाचे कल्याण होणे अवघड दिसते ! मराठी टाकायला तयार असलेले आणि नसलेले असे मराठी माणसांचे दोन गट पाडले तर त्यांच्या कल्याणासाठी दोन वेगवेगळे पक्ष लागतीलच ! शास्त्रीय राजकारणाचे पहिले श्रेय मराठी माणसाला मिळेल !
गरिबीचे, अनेक तऱ्हांच्या दारिद्र्याचे उदात्तीकरण हा तर मराठीचा ठसा बनला नसेल ? ' भरभराट ' हा शब्द चांगला की वाईट ? त्या लेखामुळे सुचलेल्या या गंमती ! उपरोध, गंमत आणि थोडे गांभीर्य !

प्रत्येक कलाकृती अपूर्णही असते आणि सदोषही. पण, तिच्यातले समग्रावधान परिपूर्ण आणि निर्दोष असू शकते.

**प्राची दुबळे यांचे गाणे -- अभिप्राय**

संगीताबद्दलचा अभिप्राय भाषेतून देताना त्याला मर्यादा पडणारच. ऐकताना आपल्याला काय वाटले, त्या ऐकण्याची सर्जक प्रक्रिया आपल्यात जिवंतपणे कशी घडली, हे जसेच्या तसे पोचवताच येणार नाही . तरीही –

चिंतनात्मकता हे तुमच्या आवाजाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. तंत्रावर हुकुमत असूनही या वैशिष्ट्याचा अभाव असलेले खूप गायक – गायिका लोकप्रिय आहेत, परंतु, बडे गुलाम, किशोरी अमोणकर यांच्यासारखे चिंतनशील गाणे हेच खरे मानवी संस्कृतीचे जगणे असते असे मला वाटते. तुमच्या गाण्याचा आवाका हा असा सखोल आणि विस्तीर्ण आहे. त्यामुळे, त्यात एक परिपक्व साधेपणा आहे. हुकुमत दाखवत बसायची तुम्हाला गरज वाटत नाही. आणि तरीही, कणाकणावर हुकुमत आहे. तुम्हाला काय करायचे आहे याची स्वच्छ समज हाच तुमचा

आत्मविश्वास. त्यामुळे त्याला अचीव्हमेंटचा ( कमावल्याचा ) वासही नाही. गाण्यातून मिळणार काय याबाबतची पूर्ण बेफिकिरी या गाण्याच्या सर्जक प्रक्रियेतच मौजूद आहे. व्यक्तिगत अनुभवाच्या मर्यादा झुगारून दिल्याचा सेन्स या गाण्यात येतो. इथे जगण्याचे तत्त्वज्ञानच व्यक्त होते, असे मला वाटते.

या गाण्यांच्या भाषिक बाजूसह ती ऐकण्यात अधिकच समृद्धता असणार. तो भाग तर मी अजून ऐकलेलाच नाही. शिवाय गाण्याचे तांत्रिक व्याकरण मला समजत नाही. पण, भीतीचा लवलेश नसलेल्या अशा संगीताचा नम्रतापूर्वक स्वीकार मी करू शकतो, कारण एका वेगळ्या क्षेत्रात मी असेच स्वतःला फेकून देण्याची कृती करत असतो, असे मला वाटते. मी खूप संगीत ऐकतो असे नाही, विश्लेषणात्मक पद्धतीने मला ते फारसे कळतही नाही, तरीही, तुमचे गाणे ऐकून मला जे वाटले ते कळवले आहे.

इतर क्षेत्रातल्या कलावंतांना येणारे रिसेप्टिव्हिटीच्या अभावाचे प्रश्न संगीत - क्षेत्रातही असतीलच. आपले काम आपल्या आकलनाप्रमाणे करत राहाणे हेच सत्य.

साथसंगतवाले उत्तम ! रेकॉर्डिंग छान ! समीर दुबळे यांना सप्रेम नमस्कार. खूप दिवसांनी महान गाणे ऐकले. **धन्यवाद !**

**एकमेकात.**

उत्तर-आधुनिकतेची सर्व वैशिष्ट्ये या नाटकात आहेत.

प्रत्येकाचेच बरोबर आणि सत्य असे काही नसतेच – असे म्हणता म्हणता अराजक हेच सत्य, असे होते.

पण अशी नाटके खूप लोकांनी पाहायला हवीत, म्हणजे, पटापट मते देण्याचे हे प्रश्न नाहीत हे लक्षात येईल.

मी पाहिलेल्या प्रयोगाची सुरुवातच पडेल झाली आणि पूर्ण प्रयोगच एक पट्टी खालीच झाला असे मला वाटले.

**तीन स्वर**

**कुमार गंधर्व**

शांत वाळवंट

एक प्रवासी ठिपका

दूरवरून येणारा काळ

काळाबाहेरून अनादाला आकार देणारा

वाळूच्या लहनमोठ्या ढिगांचे आकार असलेला

झोत खंड वारा

**भीमसेन जोशी**

प्रचंड पावसात भिजलेला

भलाथोरला वृक्ष

अंधारालाही चकित करीत जाणारा राजमार्ग

बेहद्द झोकू शकणारा

स्वतःला वाटांच्या निबिड जंजाळात

दाट... लख्ख... निःशंक...

आजानुबाहू

**सैगल**

वाऱ्याने उडून जाणारी जीर्ण पाने...

मातीवर दृष्टी खिळलेला

एका उजाड माळाभाळावरील स्थिर पक्ष्यासारखा

सैल सर्वस्व भर...

असंख्य आयुष्ये होऊन गेलेला काळ... परका...

आपल्या सगळ्या समस्या चुकीच्या शिक्षाणव्यवस्थेमुळे निर्माण झाल्या आहेत – या वाक्यावर --
शिक्षण, स्पर्धा, सुखलोलुपता, हिंसा, संघर्ष, अवलंबित्व, सुरक्षिततेची चिंता, भ्रष्टाचार, भीती, सशर्त प्रेम, मत्सर, द्वेष, भ्रम, वगैरे -- यांच्या एकमेकांवरील आणि एकत्रित परिणामांमुळे !
कुठलेही एक कारण स्वतंत्रपणे अस्तित्वातच असू शकत नाही. कारणे आणि परिणाम यांचा एक गुंता सतत घडत, घडवत असतो, असे मला वाटते. शिक्षण हे कारणही असते आणि परिणामही. एक मुख्य कारण शोधावे, असे आपल्या बुद्धीला वाटते, इतकेच.

एका क्रमशः येणाऱ्या कथेच्या पहिल्या भागानंतर --
बरोबर वागण्यासाठी सर्वांना कॉमन, सर्वमान्य अशी कुठली प्रणाली अस्तित्वात नाही. प्रत्यक्ष त्या प्रश्नात अडकलेले आणि बाहेरचेही आपापली मते, स्वभाव किंवा कुणाची बाजू बरोबर हे आधीच ठरवून भूमिका घेणार. कॉमन प्रणाली अस्तित्वात आहे असे म्हटले तरीही, ' अर्थ लावणे ' हे असणारच. आपल्या भूमिकेसाठी माणूस बाकीचे सगळे ' इलाज नाही ' या सदरात टाकायला तयार असतो. तुम्ही ' सत्य ' कसे गाठता याबद्दल उत्सुकता आहे.

दुसऱ्या व्यक्तीने माझ्यावर केलेले किंवा मी दुसऱ्या व्यक्तीवर केलेले प्रेम, या अर्थी तुम्ही बोलत नाही आहात, बहुतेक.

देवाणघेवाणीचे, भावनिक अवलंबित्वाचे, सशर्त प्रेम फ्री वगैरे असणे शक्यच नाही. त्यातून राग, लोभ, मत्सर, द्वेष यांचीही निर्मिती होणारच. कल्पनारम्यतेचा उपयोग नाही. स्वप्नीलपणापासून सावध राहावे, हे बरे. समोर जे दिसते तिथून समजून घ्यायला सुरुवात करावी. -- हे मला दिसणारे. मी काही ऑथॉरिटी नाही. कोणताही निष्कर्ष बाळगून काहीही समजणार कसे ?

बुद्धी - विचार हेच उपलब्ध साधन आहे संवादाचे. त्याच्या मर्यादा, गुणदोष लक्षात घेऊनही हा अनकंडिशनल संवाद चालु ठेवू या.

सोप्या गोष्टी गुंत्याच्या करून बोलणे म्हणजे हुशारी – या वाक्यावर --

आपल्या वागण्या-बोलण्या-लिहिण्याची गुपिते अशी फोडू नका, मित्रांनो !

कोणत्याही मानसिक सरावाने अंधारच तयार होईल !

सर्जकतेवरील चर्चेत --

आपल्याकडे स्वातंत्र्य म्हणजे विचारस्वातंत्र्य असे गेल्या काही वर्षांत फिक्स झालेले आहे. बेकेट, आयनेस्को, काफ्का, पिरांदेल्लो, गाओ झिंगजिआन हे महान लेखक कोणत्याही मतप्रणालीचा पाया घेऊन लिहीत नव्हते. या बाबतीत गाओचे इंटरनेटवर उपलब्ध असलेले नोबेल...-लेक्चर वाचावे. समग्रावधानातच सर्जकता असते, मताशी बांधील राहण्यात ती नसते. माझ्या परीने माझ्या काही लेखांतून मी हे स्पष्ट केले आहे. माझ्या वेबसाईटवरील ' लेख ' विभागातले शेवटचे पाचसहा लेख पाहावे. www.champralekhan.com ही माझी वेबसाईट आहे. बुद्धिवादामुळे मनाचा आत्मकेंद्री वापर ही एकच शक्यता गृहीत धरली जाते. धर्म, विचारसरणी वगैरे कारणांनी माणसांत होणारी फाटाफूट मान्य असणाऱ्या मनातून कसली सर्जकता अवतरू शकेल ?

सण आणि गोंधळ यांबद्दल --

धार्मिक करमणूक स्वस्त असते. यात धर्माचा काहीच संबंध नसतो. ज्ञानेश्वरांनी असल्या सर्व गोष्टींना पुण्यात्मक पाप म्हटले आहे ( ९ वा अध्याय पहा ) . गोविंदा, गणपती, दसरा, दिवाळी, वगैरे हे वाढतच चालले आहे. यालाच लोक धर्म समजतात, हा प्रॉब्लेम आहे.

एका कवितेवर अभिप्राय --

आत्महत्त्येच्या विचाराशी येऊन थांबलेले मन, आता सर्व शक्यता बंद, दुसऱ्यांच्या
प्रतिक्रियांची तिडिक आणि नुसताच भूतकाळ -- असा आशय जाणवतो. जणू काही आता
एखादा चमत्कारच वाचवू शकेल, अशी अवस्था. बंदिस्तपणाची सभय अभिव्यक्ती.

आणखी एका कवितेवरचा अभिप्राय --

सर्जकतेचा अस्त होण्याची चहूबाजूंनी भरून आलेली भीती -- हे या कवितेतल्या प्रतिमांमधून जाणवत राहते. ही म्हटले तर एक अवस्था. अशा घटनेकडे पाहण्याची हिंमत करणाऱ्या कविता फार नसतात. विझत जाणे आणि सुगीची स्वप्ने पाहणे आणि त्याचबरोबर, उत्तुंग, खोल काही घडण्याच्या शक्यता मावळत चाललेल्या ! हा आशय ‘ प्रसवणाऱ्या ‘ प्रतिमा या ‘ समजण्या ‘ बरोबरच ‘ जाणवतही ‘ जातात. मला कविता आवडली. योग्य मार्गाने आवडली की नाही हे कवीला विचारायचे नसते, हे बरेच आहे !

**हिंदू**

जगण्याची समृद्ध अडगळ

( भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी )

--टिपण--

चं. प्र. देशपांडे.

१. या कादंबरीत अनुभव, माहिती, शेरोशायरी, धर्मिक वाङमयातली उद्‌धृते, मानवी संबंधांतले, विशेषतः ग्रामीण जीवनातले बारकावे आणि तपशील यांची भरपूर रेलचेल आहे. मराठी कादंबरीत ही अशी मास्टरी क्वचितच दिसणारी आहे, असेही म्हणता येईल. प्रचंड मेहनत, अभ्यास, निरीक्षण, टिपणे करून ती जतन करणे अशा प्रदीर्घ आणि सधीर कामाशिवाय हे शक्यच होणार नाही हे स्पष्टच आहे. हा भरपूरपणा या कादंबरीच्या सहाशे पानांत ओसंडून वाहतो आहे. या वैशिष्ट्यासाठी सदर कादंबरीला प्रथम एक सलामच ठोकला पाहिजे. ( पुढल्या आवृत्तीत दुरुस्त करावी अशी लक्षात आलेली एक चूक म्हणजे, ‘ साथी न कोई मंजिल ‘ हे गाणे ‘ काला पानी ‘ या सिनेमातले नसून ‘ बंबईका बाबू ‘ या सिनेमातले आहे. )

२. या कादंबरीतली बहुसंख्य पात्रे आणि स्वतः नायक हा हिंदू आहे, हे कारण सोडता या कादंबरीला ‘ हिंदू ‘ हे नाव देण्यातले औचित्य दिसत नाही. या दृष्टीने तर आपल्या बहुसंख्य कथाकादंबऱ्या या ‘ हिंदू ‘ च म्हणता येतील. हिंदू धर्म वा जगण्याची पद्धत यावर कोणताच सखोल भर या कादंबरीत नाही. काही शाब्दिक, बौद्धिक संबंध दाखवण्यापलीकडे या क्षेत्रातले इथे काही नाही. नाहीतर, या विषयावरची सहाशे पानांची कादंबरी हातात पडूनही भावना दुखावणारे कुणालाच काहीच सापडू नये, असे घडले नसते. माणसांतले भलेबुरे संबंध, वागण्याच्या असंख्य पद्धती हे तर जगभर आहे. हेच इथे जे घडते ते हिंदू धर्माच्या प्रभावामुळे घडते , असे आकलन काही ही कादंबरी देत नाही. मग हे नाव कशासाठी दिले ? आधी ठरले होते, हे कारण असेल. आता नुसते ‘हिंदू‘ म्हणणे फारसे अर्थपूर्ण ठरत नाही, हे लक्षात आल्यामुळेच, ‘ जगण्याची समृद्ध अडगळ ‘ हे नंतर जोडले असावे. तरीही, हिंदू असण्याचा आणि जगण्याची समृद्ध अडगळ असण्याचा काय संबंध, असा एकत्रित आवाकाही ही कादंबरी घेत नाही. ‘जगण्याची समृद्ध अडगळ’ हे खरे तर या कादंबरीतल्या एकूण मटेरियललाच लागू पडते. त्यामुळे, काही पानांवरून नुसती नजर फिरवत, उड्या मारत ही कादंबरी वाचली तरी काही बिघडत नाही. हे सगळे एकत्र धरणारे अंतर्गत भान इथे अनुपस्थित आहे. यात आणखी चार गोष्टी वाढवताही येतील किंवा आहेत त्यांतल्या कमीही करता येतील, कारण ही नुसती समृद्ध अडगळ आहे. समृद्ध असणे चांगले आहे, पण कादंबरीलाच अडगळीचे रूप येणे, हा दोष वाटतो. या वेगवेगळ्या लघुकथा असत्या तरी काय फरक पडला असता ? की नेमाड्यांना लघुकथा हा फॉर्म कमी दर्जाचा वाटतो म्हणून असे झाले असेल ? सहाशे तीन पाने ! बाप रे !

दोनतीन दिवस माझे इंटरनेट बंद होते, त्यामुळे या चर्चेत सहभागी होणे लांबले. एक म्हणजे, आशयाचा धबधबा आणि तपशीलांचा धबधबा यांत फरक केला पाहिजे. आशयाचे स्रोत न येता तपशीलांचा मारा होऊ लागला तर कलेच्या क्षेत्रात कितपत भारून जाता येईल ? दुसरे, ‘ हिंदू ‘ हा शब्द नेमाडे ' धर्म ' या अर्थाने वापरतच नाहीत, असे विधान करता येईल ? आणि सांस्कृतिक म्हणजे काय ? धर्म वगळून ? तिसरा मुद्दा फॉर्मबद्दलचा. एखादा फॉर्म तुम्ही हाताळू इच्छित नसाल, पण त्यातून आशयाची समृद्धता व्यक्त होऊ शकत नाही, असे म्हणणे हे नुसतेच अप्रगल्भपणाचे नसून या लेखकाचा भरच उथळ गोष्टींवर आहे, हे दाखवणारे आहे. त्यामुळेच, त्यांची समीक्षाही विद्वत्तापूर्ण असूनही मौल्यवान ठरणारी नाही.

कोणत्याही चांगल्या कलाकृतीत, कलाकृतीच्या प्रत्येक भागात आणि पूर्ण कलाकृतीत त्या कलावंताचे सर्जक भान उपस्थित असते, ते त्या कलाकृतीला आशयाची एकात्मता आणि समृद्धता देते. ते या कलाकृतीत नसल्यामुळे, तपशीलांमधून येणारा तथाकथित आशय सर्वांनाच आवडेल असे नाही. बऱ्याच जणांना त्यामुळेच ही कादंबरी आवडलेली नाही, हे वरील कॉमेंटसवरून स्पष्ट होते आहे. यापुढची स्टेप म्हणजे, मतभेदाला वाव ठेवणे. हीच कादंबरी कुणाला आवडत असेल, आनंद देत असेल  तर दुसऱ्या कुणाला काय प्रश्न असणार आहे ?

**मग काहीच प्रश्न नाही !**

प्रत्येकाचे जग वेगळे आहे. दहा कोटी लोकांत प्रसिद्ध असणे वा बदनाम असणे म्हणजे, व्यावहारिक फायदेतोटे सोडता, एकाच व्यक्तीकडे प्रसिद्ध वा बदनाम असणे !
ती व्यक्तीही एकाकी असणारी, स्वतःच्या सुखदुःखांत बोंबलत जगणारी ! मला फायदा हवा असेल तर मी प्रसिद्ध असायला हवे ! ठीक आहे, समजा मी फायदे मिळवून गेलो, कुणाची काही तक्रार नाही, कदाचित माझा एकाकीपणा सुसह्य झाला, मृत्यू सुसह्य झाला किंवा बदनामीमुळे समजा उलटे झाले, तरी प्रत्येक वेळी जे काही होणार ते एका माणसाचे किंवा एका माणसाच्या ठिकाणी किंवा एका माणसाच्या बाबतीत होणार ! म्हणजे, मला निर्भय जगायचे असेल तर मला नाकारावी लागते फक्त एकच व्यक्ती ! तीही तशी, मीच कल्पिलेली ! तरीही मी घाबरतो याचा अर्थ मी फायदे कमी होण्याला वा अजिबातच न होण्याला घाबरतो ! प्रसिद्धी वा बदनामी हे महत्त्वाचे नसतेच !आश्चर्य म्हणजे, फायद्यातोट्याच्या कल्पनाही माझ्या वेगळ्याच असतात ! तशा आणि त्याच दुसऱ्या कुणाच्याच नसतात ! मग काय गरज आहे हा आटापिटा करायची ? एक व्यक्ती मेली की माझी प्रसिद्धी वा बदनामी संपणार आहे ! आणि ती व्यक्तीही माझ्या कल्पनेतलीच ! व्हाय वरी ? मीच तर फक्त आहे ! आणि मी बहुतेक माझ्या कल्पनेतला नसावा ! कारण माझी सुखदुःखे, वेदना मला प्रत्यक्ष जाणवतात ! हे तरी बरे आहे ! हे संपले की संपले ! मग हे तरी कशाला ? नष्ट व्हायची भीती वाटते म्हणून ? आणि काय नष्ट होईल ? आणि जे काय असेल ते नष्ट झाल्याचे कुणाला कळेल ? मला तर कळणार नाही हे नक्की !
**मग काहीच प्रश्न नाही !**

An event is a static reaction, Art is Stream.
An event is an event because I react to it as an event. When there is an originality-moment there are no events.
मी हेतूरहित क्षणात असेन तर घटना नाही. माझ्या सहेतुक प्रतिक्रियेमुळेच घडणाऱ्या गोष्टीची घटना होते. ' हेतूरहित घटना ' म्हणजे काय ? काल्पनिक उदाहरणे पुस्तकी आणि मर्यादित असतात, हे लक्षात घेऊनही एक उदाहरण देतो. एखाद्याने माझी फसवणूक करण्याला घटनेचे रूप तेव्हाच येते जेव्हा त्यामुळे मी दुःखी होतो. मी दुःखी झालो नाही तर ? असे होण्याला कुणी ऍबनॉर्मल म्हणून सोडून देईल. क्रिया- प्रतिक्रिया यांच्या चक्राबाहेर एक क्षणही जगणे असू शकत नाही, असे गृहीतच धरायचे ठरवले तर ‘ अहेतुक ‘ हा शब्द भाषेतून  रद्दच करावा लागेल.
म्हणूनच क्लासिक कलाकृती या प्रतिक्रियावादी, भूमिकावादी नसतात.
खरे आहे, तुकाराम म्हणतो,
कोण्या कारणे हे जालेसे निर्माण । देवाचे कारण देव जाणे ।।
विश्वाचा काही प्रॉब्लेम नाही, तो मानवी मनाचा आहे.

सार्वजनिक धर्मिक उत्सव आणि प्रदूषण यांबद्दल --

धर्म समजण्यासाठी सार्वजनिक दहीहंडी, सार्वजनिक गणेशोत्सव, सार्वजनिक नवरात्र यांची काहीही आवश्यकता नाही. हे आता स्वस्त करमणुकीचे, उन्मादरूपी मानसिक नशेचे आणि राजकीय कृतिशीलतेचे प्रकार झालेले आहेत. मोठा गणपती बसवा पण विसर्जन छोट्या पूजेच्या गणपतीचे करा, हे तर सगळा वेडेपणा चालु ठेवूनही करता येण्यासारखे आहे. शहाण्या व्यक्तींना करता येईल अशी गोष्ट म्हणजे, घरी धातूची ( हवे तर पंचधातूची घ्या ) मूर्ती बसवून तिचे विसर्जन घरीच एखाद्या मंगल-पातेल्यात करणे. नंतर ती मूर्ती स्वच्छ पुसून योग्य जागी सुखरूप ठेवून देणे. हेही, आरास, दंगा, दहाबारा आरत्या, घालीन लोटांगण, रोज करूनही करता येण्यासारखे आहे. यात श्रद्धेला धक्का बसायचा कुठे प्रश्न येतो ? सगळ्यांच्या जगण्यालाच धोका निर्माण करणे, याला श्रद्धा नाही, सरळ वेडेपणाच म्हणावे लागेल. स्वार्थ, करमणूकीची नशा, मौजमस्ती इत्यादींना कुठेही कात्री न लावता, माणसासह सर्व प्राणिमात्राच्या हितासाठी, या गोष्टी कायद्यानेही अंमलात आणायला काय हरकत आहे ?

कुणी म्हणाले, असे घरात विसर्जन करता येणार नाही. ठीक आहे, मंगल-पातेले घराच्या बाहेर ठेवा ! विसर्जनानंतर त्यातले पाणी बाहेर बागेत वा इतरत्र टाकून द्या आणि मूर्ती बाहेरच स्वच्छ पुसून मग घरात आणा ! जगण्याचे प्रश्न आले तेव्हा शेकडो कर्मकांडे आपण बंद केलेलीच आहेत की ! उगीच अडचणी सांगण्यात अर्थ नाही. श्रद्धेला अथवा वेडेपणाला, दोन्हीलाही धक्का न लावता मार्ग निघू शकतो. तरीही न ऐकणाऱ्यांसाठी कायद्याचा बडगा हवाच ! यानंतर, मग बिचाऱ्या मूर्तिकारांच्या उपजीविकेचे काय, असे काळजीचे प्रश्न, सगळ्या प्राणिमात्राची वाट लावायला निघालेले हेच लोक विचारतात.

शासन या बाबतीत एक ऍक्शन-प्लॅन राबवू शकते. माणसासह सर्व प्राणिमात्राच्या हितासाठी या एकूण प्रकारात पर्यावरणलक्षी सुधारणा कशा करता येतील यावर जनतेकडून सूचना मागवायच्या. नंतर लोकमान्य अशा पाचसहा धर्ममार्तंडांची एक समिती नेमून याबाबत, योग्य ते मानधन देऊन, त्यांचा सल्ला घ्यायचा आणि लगेच कायद्याची प्रक्रिया सुरू करायची. यात धोका एकच आहे – सगळे धर्ममार्तंड एकूण प्राणिमात्राच्या मुळावर येणारेच निघाले तर ? पण हे ट्राय तर करायलाच हवे. बाय द वे, याच विषयावर मी ‘ ढोलताशे ‘ नामक एक नाटक लिहिलेले आहे.

या ना त्या प्रकारे आपली ' ओळख ' पक्की करत जाण्याचा धंदा आपण सगळेच करतो आहे. हे असेच चालु ठेवून प्रश्न मिटतील हा भ्रम आहे, हे सत्य पाहायला सगळ्यांचाच नकार आहे. याबाबत कुठलाही प्रश्न विचारला तर आध्यात्मिक म्हणून तो त्याज्य ठरतो ! खोटे आध्यात्मिक किंवा अनाध्यात्मिक या दोनच प्रकरांत माणसे विभागलेली आहेत ! त्यामुळे, आता धर्माचा वगैरे काही प्रश्न उरलेलाच नाही. कुणी कुणाला दोष द्यायचा ?

विखुरलेल्या ' मी ' ने स्वतःला संकलित करायचा प्रयत्न करणे किंवा बाहेरचा ' मास्तर ' निवडून ' शिस्त ' आणण्याचा प्रयत्न करणे, दोन्ही अंतर्द्वंद्वात्मक असल्याने, शिस्त तर येणारच नाही पण मानसिक संघर्षमयता वाढेल. नुसताच थकवा येईल. हे सत्य आता प्रत्यक्ष दिसावे. ‘ माझे ‘ मानसिक कष्ट प्रश्न अधिक जटिल करतात, हे लक्षात येणे अवघड नाही.

**बुद्धी आणि सामाजिक बांधिलकी**

The intellect is not a serious thing, and never has been. It is an instrument on which one plays, that is all.
– Oscar Wilde.

We should take care not to make the intellect our god, it has, of course, powerful muscles, but not personality. -- Albert Einstein.
The limits of my language are the limits of my world. -- Wittgenstein.

मी स्वतः काही तत्त्वज्ञही नाही आणि तर्कज्ञही नाही. जगणे समजण्यासाठी तसे असायची गरजही नाही, हेच तर इथे म्हणायचे आहे. समजण्याच्या शक्यतेतली ही ‘ समता ‘ जर खोटी धरली तर कुणालाच काही समजू शकत नाही, असे तर होईलच पण एकूणच मानवजातीचे जगणे म्हणजे कायमस्वरूपी वेड्यांचा बाजारच असणार, असेही गृहीत धरल्यासारखे होईल. ज्ञानेश्वर, तुकाराम यांनी त्यांच्या जगण्यातून आणि लेखनातून ही मूलभूत समताच सिद्ध केली, हे त्यांचे सर्वोच्च महत्त्वाचे कार्य आहे, यात शंका नाही. याच बाबतीतले, काही महत्त्वाचे मुद्दे खाली देत आहे : --

१. माणसाची शारीरिक अवस्था, मेंदूच्या उत्क्रांतीतला टप्पा, मेंदूच्या पेशी, रसायने, त्याची स्मृती, अनुभव, माहिती यांनी बुद्धी ही मर्यादित असते. ती कधीच परिपूर्ण वा अंतिम असू शकत नाही.

२. बुद्धी ही एकरेषीय आणि विश्लेषणात्मक पद्धतीनेच चालु शकत असल्यामुळे ती करोडो कारण-परिणामांचा, कोणत्याही घटनेचा वा वस्तुस्थितीचा एका क्षणात परिपूर्ण आवाका कधीच घेऊ शकत नाही.

३. माहितीने ओव्हरलोड झालेल्या जगात, कोणती माहिती योग्य निष्कर्षापर्यंत पोचण्यासाठी आवश्यक आहे, हे ठरवता येत नाही.

४. बुद्धिवाद्यांतच मतभेद होत असल्याने, बुद्धीने ‘ आदर्श ‘ वा ‘ सत्य ‘ सापडत नाही हे स्पष्ट होते.

५. बुद्धिवादात मनाचा वापर करण्याची सवयीची पद्धत गृहीत धरावी लागते. त्यामुळे, अलगतावाद, स्वार्थीपणा, महत्त्वाकांक्षा, वर्चस्वाची इच्छा, सुखोपभोगाची हाव, बेफिकिरी, अन्याय, विषमता, क्रूरपणा हे सर्वच गृहीत धरावे लागते. त्यामुळे, बुद्धिवाद म्हणजे निराशावाद असा सारांश निघतो आणि बुद्धिवाद मूल्यहीनही ठरतो.

६. बुद्धिवादाने एका एका गटाचा विचार करता येतो पण पूर्ण मानवजातीच्या हिताचा आवाका घेता येत नाही. त्यामुळे, वेगवेगळ्या गटांनी एकमेकांवर अन्याय करणे, एकमेकांचा छळ करणे, सदोदित विषमतेचीच निर्मिती करणे समर्थनीय ठरते.

७. थोडक्यात, मानवी श्रेयसाच्या दृष्टीने बुद्धिवाद कुचकामी ठरतो.

‘ सामाजिक बांधिलकी ‘ वाल्यांच्या कलेत आणि समीक्षेत या मुद्यांच्या आकलनाला कितपत स्थान असते ?

Living without intellect is not advocated, of course.

पुढे दिलेली काही वाक्ये वरील नोटमध्ये समाविष्ट करावीत का ? : -- १. बुद्धिवादी हे अंतर्विरोधाने मद्दड झालेले आणि मूलतः महामूर्ख असतात. २. सामाजिक बांधिलकीचे पुरस्कर्ते हे बुद्धिवादी असतात. ३. सामाजिक बांधिलकीची कला व समीक्षा माणसाला शहाणपण ( WISDOM ) देऊ शकत नाहीत. ( आणि आता विद्वानांच्या विचारासाठी एक जनरल वाक्य -- ) ४. बुद्धिवादाच्या प्रभावमुळेच माणसाचे विक्रमी नुकसान झालेले आहे.

कधी काळी धर्म जगण्यातल्या एकात्मतेबद्दल बोलला असेल पण बुद्धीने त्याचेही विचारव्यूह केले आणि धर्माला स्वतःच्या क्षेत्रात शोषून घेतले आणि धर्म नामशेष झाला. अलगता निर्माण करणे, फूट पाडणे ही मानवी संबंधांतली बुद्धीची प्रमुख कामे आहेत. त्यामुळे, एखाद्या बुद्धिवाद्याने

तथाकथित धार्मिक कट्टरतावाद्याला हसणे, क्षुद्र लेखणे अथवा जंगली समजणे हे अतार्किक आणि असमर्थनीय ठरते. दोघेही बुद्धीचा वापर करूनच, वेगवेगळ्या प्रकारे जगण्याच्या चिंधड्या उडवत असतात, हे लक्षात घेतले पाहिजे. बुद्धीशिवाय माणसाकडे दुसरे कुठले साधन आहे, असा प्रश्न बुद्धीनेच विचारावा आणि स्वतःकडे देवत्व घ्यावे, हा सापळाही स्वच्छपणे पाहिला पाहिजे. हा हिडीसफिडीस करण्याचा प्रश्न नसून वस्तुस्थितीकडे पाहण्याचा प्रश्न आहे. बुद्धीच्या, विचारसरणीच्या मर्यादा ओलांडून काही कलाकृती जेव्हा ‘ समग्रावधानी ‘ होतात ( अशाच कलाकृती मोठ्या व सांस्कृतिक महत्त्वाच्या असतात ) त्यांना ‘ सामाजिक बांधिलकी ‘ वाले ‘ आत्मकेंद्री ‘, ‘कलावादी ‘ वगैरे म्हणून हिडीसफिडीस करतात. जगण्याची दुसरी काय समज असू शकते ते माहीत नाही पण सध्याची सर्व वाटचाल तर विदीर्णतेकडे होत असल्याचे दिसते आहे, इथून सुरुवात व्हायला हवी. एकच साधन उपलब्ध आहे म्हणून त्याची अंधश्रद्धा करण्यात अर्थ नाही. ( याबाबत कलेच्या अंगाने केलेले सविस्तर विवेचन माझ्या काही लेखांत, माझ्या www.champralekhan.com या वेबसाईटवर दिलेले आहे. )

मित्रजी, वाह ! मजा ! तुम्ही देव म्हणता म्हणून मीही देव म्हणतो ! बुद्धीच्या मर्यादा बुद्धीने समजण्याची शक्यता जर देवाने ठेवलीच नसती तर धर्माचा प्रश्नच आला नसता ! आता दुसरे मित्रजी ! ‘ बुद्धिवादी ‘ म्हणजे, स्मृती, अनुभव, माहिती यांवर आधारित असणारी बुद्धी – हाच जगण्याचा पाया समजणारी व्यक्ती. जाणिवा, सहजप्रेरणा यांपेक्षा तर्कावर भर असणे म्हणजे बुद्धिवाद. ‘ आदर्श ‘ आणि ‘ सत्य ‘ हे शब्द ‘ श्रेयस ‘ या अर्थी घ्यायला तुमची हरकत नसेल असे समजतो. याच्या अनेक शक्यता असतील ? दुःखाला तर आपण आदर्श म्हणणार नाही ! की ‘ सत्य ‘ म्हणू ? मग तर थेट उडी मारणेच उरेल ! बुद्धीने श्रेयसचा आराखडा करताना असंख्य आराखडे तयार होतात, माणसामाणसांत फूट पडते, हिंसा होते, कत्तली होतात, या अर्थी ‘ सत्या ‘ च्या अनेक शक्यता असतात, हे म्हणणे बरोबर आहे. कल्पनाशक्ती हा बुद्धीचा भागच आहे, यात मतभेद नाही. तीही आपल्या प्रोग्रॅमिंगवरच आधारित असते. तिचे वेगळे महत्त्व काय ? आणि आता तिसरे ! त्यांच्या मते सदसदविवेकबुद्धी हा बुद्धीचा व्यापक अर्थ आहे. हा विवेक जर स्थलकालपरिस्थितीसापेक्ष, गटसापेक्ष आणि व्यक्तिसापेक्ष असेल तर व्यापक कसा ? की सदसदविवेक असे काही वैश्विक सत्य अस्तित्वात आहे ? ‘ फलाशा न धरता कर्म करावे ‘ हे जर जगण्यातले सत्य नसेल आणि तिथपर्यंत पोचायचे आहे, असे एक आदर्श तत्त्व म्हणून स्वीकारले गेलेले असेल तर ते बुद्धीच्याच क्षेत्रात येते, हे स्पष्ट आहे. याच पद्धतीने धर्म नामशेष झालेला आहे. त्यामुळेच धर्माच्या नावावर चाललेली हिंसा, द्वेष हे सर्व बुद्धीचेच दोष ठरतात. आता राहतो प्रश्न, जगणे समजण्यासाठी बुद्धीची गरज आहे की नाही याचा. सध्या सगळ्यांचे ‘ जगणे समजणे ‘ बुद्धीवरच तर चालु आहे ! आणि त्यामुळेच तर सगळे जगणे दुःखमय, विदीर्ण, चिंधड्या उडालेले असे झालेले आहे ! बुद्धी मर्यादित असल्याने समज मर्यादित असते आणि त्यामुळेच ती संघर्षमय असणे अटळ ठरते. संघर्ष, दुःख, छळ हे सगळे ‘ समज ‘ आल्याचे निदर्शक म्हणता येईल ?

आपल्याला दिल्लीला जायचे असेल तर दिल्लीच्या गाडीत बसणे, आपल्या घराचा रस्ता लक्षात ठेवणे वगैरे कामांसाठी बुद्धी लागतेच, तो प्रश्न नाही. गणित, शास्त्र, तंत्रज्ञान यांसाठीही बुद्धी हवीच, तोही प्रश्न नाही. प्रश्न हा आहे की बुद्धी माणसाचे जगणे प्रश्नमय, संघर्षमय, दुःखमय करते. हा प्रश्न सुटला, त्याच्यात सुधारणा झाली असे कुठे कुठे दिसत असले तरी प्रत्येक व्यक्तीचे, समाजाचे आणि एकूणच माणसाचे जगणे सडवण्याचे काम बुद्धीच करते. हे सतत चालु आहे. माणसाच्या जगण्यात स्वर्ग अवतरवण्याचे बुद्धीचे दावे खोटे असतात, हेच इथे म्हणायचे आहे. हजारदा मार खाऊनही बुद्धीच आपल्याला विश्वसनीय आणि तारक वाटते !

निर्वाणाचे सत्य वगळलेला बौद्ध धर्म, नुसत्या बौद्धिक कलमांचा बनवून अलीकडे पुढे आणलेला तथाकथित शिवधर्म, नुसती सुभाषिते, पाठांतर आणि करमणूकप्रधान, पलायनवादी उत्सव या रूपात उरलेला हिंदू धर्म आणि एकूणातच आपण फारच भारून गेलेले निष्ठावान आहोत या भ्रमात आयुष्य व्यतीत करायला साहाय्यभूत होणारे सगळेच धर्म, हे सर्व, मयत झालेल्या मूळ धर्मांचे बौद्धिक अवशेष आहेत. अशा या मृत धर्मांच्या मानगुटींवर जिवंत बुद्धीचे भूत बसले आहे. माणसाची बरबादी होत जाण्याचे हेच कारण आहे.

मित्रजी, याचे उत्तर वर आलेले आहे. मेंदू बंद पाडून, भाजीपाला होऊन पडावे असे इथे म्हटलेलेच नाही. बुद्धीमुळे होणारी भौतिक प्रगती त्यागावी असेही म्हटलेले नाही. जिथे जिथे माणूस स्वतःच्या आणि इतर अशा असंख्य प्रतिमांच्या जंजाळात जगतो त्या पूर्ण क्षेत्राबाबतचे हे विवेचन आहे.

सुमारे सतरा वर्षांपूर्वी लिहिलेली कविता

**धर्म**

चं. प्र. देशपांडे.

शेवटी माझ्यावर आले.
प्रत्येक धर्माची वैशिष्ट्ये होती
त्याला मी काय करणार ?
हाच प्रॉब्लेम असल्याचे चाचरत सांगितले.
पण तो सोडवायचा होता.
प्रॉब्लेमच नाही असे खरे तर हवे.
मग सोडवणार कसा ?
सोडवताना सगळे टिकत होते.
' नव्या रचनेत विसावेल सगळे '
मला खरे वाटत नव्हते.
धर्म हा नाकारता, स्वीकारता किंवा बदलता कसा येईल ?
पण मी ' हो ' म्हणालो.
आणि लगेच किंबहुना त्याच वेळी
नव्या रचनेला नकर दिला.
संकट शेवटी होते म्हणण्यापेक्षा
आधीच होते.
माझ्यामुळे काहीच घडले नाही.

मी कसा काय जबाबदार ?
माझा धर्मच ...
म्हणजे टाळता येणार नाही.
शरीराला आकार असणारच.
' संघर्ष टाळण्यासाठी सुधारणा हवी.
अन्याय टाळण्यासाठी सुधारणा हवी. '
माझ्या सुरक्षिततेची कास न सोडता
व्यवहार्य मार्ग म्हणून जागेपणी
स्वप्नात सामील व्हायचा निर्णय घेतला.
निदान मला समजलेले
उघड तरी होणार नाही.
फरक फक्त इतकाच राहिला --
मी जे म्हणत होतो
त्याच्यावर माझाच विश्वास नव्हता.
यालाच काहीजण परिपक्वता समजले ...
-- हे एकवेळ चालु शकेल.
--- ००० ---

आपल्याला जाणवलेले, आकळलेले काहीतरी व्यक्त करण्यासाठी, त्यात इतरांनाही सामील करून घेण्यासाठी निरनिराळ्या कलाप्रकारांतून अभिव्यक्ती होत असते. संगीत, नृत्य, साहित्य, चित्रकला, शिल्पकला, नाटक, सिनेमा हे वेगवेगळे कलाप्रकार आहेत, त्यांची वेगवेगळी बलस्थाने आहेत. साहित्यात कविता, कथा, कादंबरी, नाटक, निबंध, ललित लेख वगैरे फॉर्म्स आहेत. त्यांचीही वेगवेगळी बलस्थाने आहेत. शिवाय प्रत्येकाचे कल, आवडी हे प्रकार असतातच. त्या त्या वेळी वाटेल त्या फॉर्ममधून कलावंत अभिव्यक्ती करत असतो. विचारक्रिया आणि कविता यांचा संबंध विचित्र समजायचे कारण नाही. इंग्रजीत चॉसर आणि अलेक्झांडर पोप ही दोन मोठी उदाहरणे आहेत. ' कवितेतील अ--भाव ' या माझ्या लेखात मी याबाबत सविस्तर लिहिलेले आहे. कविता म्हणजे काहीतरी भावनिक, नाजूक, स्वप्नील, असे काही नाही. कोणताही गैरसमज नाही, हे उत्तरही तुम्हाला अपुरे वाटले तर कृपया अजूनही विचारा. फेसबुकचा अशा देवाणघेवाणीसाठी उपयोग व्हावा असेच मला वाटते

कविता उत्कटही असू शकते पण उत्कटता हे काही कवितेचे व्यवच्छेदक लक्षण नाही. तसेच उत्कटता असली तरच कविता श्रेष्ठ होते असेही नाही. स्वतःच्या भावभावना, अनुभव व्यक्त करणे हा कवितेचा एक उद्देश असू शकतो पण तो एकच उद्देश असू शकतो, असे नाही. एकूण जगण्याच्या प्रक्रियेचे समग्र भान व्यक्त करणे, हेही, इतर कोणत्याही कलाप्रकाराप्रमाणेच, कवितेपुढचेही मोठे आव्हान. हे असते सगळे नेहमी उत्कटच असते किंवा असले पाहिजे असे काही नाही. अगदी ढोबळ भाषेत बोलायचे झाल्यास, कवी म्हणजे कुठेतरी हरवलेला, डोळे तारवटलेला, केस पिंजारलेला

आणि कपडे फाडत फिरणाराच असला पाहिजे, असे काही नाही. नीट जगताना दिसणाऱ्याचीही कविता उत्तम असू शकते. काळानुरूप होणाऱ्या बदलांमुळेही भावनिक कवितेचे प्रमाण कमी झालेले आहे.

काही टिप्स सापडतात का पाहू. १. सगळ्याच कविता मला समजतील असे नाही. २. अपवाद वगळता, इतर वाचनाप्रमाणे, पहिल्याच वाचनात कविता ' तितकी ' समजेल असे नाही. ३. निवेदन वा वर्णन समजेल तशी कविता कधीच समजणार नाही. -- हा पाया. कविता ही अर्थसंपृक्त असते. तिला वेळ द्यावा लागतो. पहिल्या वाचनात विषय, आशय, मूड, व्यक्तिगत अनुभव आहे की काही सामाजिक अन्यायाचा पंचनामा आहे, उपरोध आहे की प्रेम, विरह, शोक असे काही आहे अशा स्वरूपाचे काही लक्षात येऊ शकेल. दुसऱ्या, तिसऱ्या वाचनात त्या कवितेतले शब्द, प्रतिमा, त्यांचा क्रम या गोष्टी अधिक बोलु लागतील, तिचा नाद, आवर्तने ऐकू येऊ लागतील. मुख्य म्हणजे कवितेच्या भाषेत कविता समजू लागेल. या पद्धतीने प्रत्येक वेळी नव्याने आपली प्रक्रिया शोधावी लागेल. आधी पूर्वग्रह सोडायला हवेत. कविता डोक्यात जाते असे गृहीत धरायचे नाही. धीर हवा. सहवासाने कविता अधिक कळते. अशी तयारी असेल तर चांगली कविता अत्युच्च महत्त्वाची चिंतनशीलता बहाल करू शकते.

--- ००० ---

चं. प्र. देशपांडे, ३,स्नेहदीप अपा., चिंतामणीनगर, सहकारनगर नं. २, पुणे – ४११००९. फोन – २४२२७८४७ / ८, ९३७१००५७७३.
ईमेल – champrade@gmail.com वेबसाईट – www.champralekhan.com

# फुलपाखराचे पंख

**-- चं. प्र. देशपांडे.**

अपमानित होणे, जवळचे कुणी गेल्याने वा कोणत्याही नुकसानाने दुःखी होणे, स्वतःची प्रतिमा भंग पावल्याने मृत्यूचे दुःख भोगणे -- यांवर हिंदुत्ववाद, समाजवाद, साम्यवाद वा कोणतीही विचारसरणी काय म्हणेल ? 000

सुंदर ! आपले कोल्हापूरचे ( माझ्या आयुष्यातले बेस्ट ) दिवस आठवले ! आपल्या आणखी एखाद्या रंगतदार भांडणासाठी या आल्बममधले मुद्दे शोधून ठेवतो ! धुके तर दिसते आहे ! बघू या ! 000

cultivation of love हा प्रकार कृष्णमूर्तीच नाकारतात. धर्म म्हणजे जर मनाच्या वापरातच आमूलाग्र बदल असेल तर या आहे अशा या मनाने केलेल्या बाकीच्या चर्चा निरर्थक चर्चा ठरतात. उत्तम बडबडगीते माझ्याही आहे या मनाला आवडतात. पण हे आवडणे अर्थातच त्या आमूलाग्र बदलाला अडथळा आणणारे ठरू शकते, कारण हा मनाचाच सापळा असतो. पण हवाय कुणाला आमूलाग्र बदल, हा प्रश्न असतोच ! आहे या सवयींबद्दल कुणालाच काही संशय नसेल तर ही सगळी फक्त मतमतांतरे ! माझेही हे एक मतच धरून चालावे ही विनंती ! 000

स्वतःची ' खरी प्रतिमा ' म्हणजे काय ? ' पवित्रा ' नसलेली प्रतिमा असू शकते ? ' भूमिका ' वाले या खोटेपणाच्या भांडवलवादावर तर पोसले जाऊन गलेलठ्ठ होतात !

मी बरोबर असलो पाहिजे, योग्य असलो पाहिजे, मी ज्यांना मानतो त्यांना मी चांगला वाटलो पाहिजे, माझ्या हातून लोकांचे भले झाले पाहिजे, मी परिवर्तन आणले पाहिजे, कशाला किती महत्त्व द्यावे हे करेक्ट कळून मला वागता आले पाहिजे, किंबहुना मी नेहमी करेक्टच असतो, असे व्हायला हवे ! समजा हे शक्य नाही, लोकांचे सोडा, माझाच गोंधळ होत राहणार आहे, तर काय ? क्लॅरिटी कशाला म्हणावे ?

आपल्याला खरे प्रॉब्लेम्सच नाहीत, हा खरा प्रॉब्लेम आहे ! 000

जगणे हाताबाहेर असल्याची भयग्रस्त हतबलता ही संवेदनशील मनाची सार्वत्रिक भावना आहे. तिला अभिव्यक्ती देणारी कविता. यातून स्वतःच्या जगण्याबद्दल कोणताही प्रश्न पडलेला दिसत नाही. त्यामुळे एक सार्थ प्रतिक्रिया हीच या कवितेची मर्यादा ठरते. ०००

एक साधा झोपडीतला माणूस लोकसभेसाठी उभा राहू शकतो आणि निवडून येऊ शकतो, अशी कल्पना तरी करू शकतो का आपण ? हा असा डोलारा उभा करणारे कोण ? ही पूर्ण रचनाच ( आपल्यासह ) सडत चालली आहे की नाही ? या प्रश्नांना अग्रक्रम आहे की नाही ? ०००

मी प्रतिमायुक्त आहे याचा अर्थच सगळ्याहून अलग आहे म्हणजेच सगळ्याशी संघर्षात आहे. त्यामुळे मला इजा होत राहणारच ! कोण कुठे तक्रार करणार ? ०००

तो म्हणाला, " आपण एकमेकांवर प्रेम तर करतो, पण प्रेम म्हणजे काय याच्या एकमेकांच्या व्याख्या नेमक्या काय आहेत हे अजून आपल्याला माहीतच नाही ! " व्याख्यांची चर्चा हवी कशाला ? प्रत्येकानं आपापल्या तऱ्हेनं प्रेम करावं, हेच उत्तम ! -- आपापल्या तऱ्हेने म्हणजे आपापल्या शर्तींवर ! ०००

आपला मेंदू आपण एकदशांशही वापरत नाही असे म्हणतात. म्हणजे सध्याच्या दसपट असा मेंदूचा वापर केला तर, आहे या पद्धतीने आपल्याला दसपट भंजाळून जाता येईल. आपल्या अनेक प्रतिमांनी आपण जगतो, हे लक्षात घेतले तर आपणच रावण ठरतो ! आपण राम आहोत असे समजून रावणाचा वध झाला असे समजणे, हे आपल्या अकराव्या प्रतिमेचे काम ! ०००

उत्तम ! ही छानच लिंक निघाली ! त्या ग्रुपमधले बरेचसे कम्युनिस्ट होऊन वाया गेलेत, पण मित्र या नात्यात फरक नाही. ( त्या सर्वांच्या मते, कदाचित, मी कम्युनिस्ट न झाल्यामुळे वाया गेलेलो असण्याची शक्यता आहे ! ) असो. ०००

संगीत, लेखन, चित्र वगैरे माध्यमांतून खूप कलावंतांनी ग्रेट अभिव्यक्ती दिलेली आहे. या बाबतीत, हे वाचले का, ते ऐकले का असे श्रीमंती कमावण्याचे वातावरण तयार होऊ द्यावे का, असा प्रश्न पडतो. त्या ग्रेटनेसवर त्या माध्यमांची अथवा त्या संबंधित कलावंतांचीही मालकी असू शकत नाही. तो ग्रेटनेस जे स्वतःत अवतरू देतील त्यांना इतक्या संपर्कांची काय आवश्यकता राहील ? ग्रेटनेसची वखवख का होते ?

संगीतातला ग्रेटनेस आणि लेखनातला ग्रेटनेस हे वेगवेगळे नसतात. खूप कलाकृतींतून ग्रेटनेसला सामोरे जाणे आणि एका कलाकृतीतून ग्रेटनेसला सामोरे जाणे यांत काहीही फरक नसतो. -- याच्या सत्यासत्यतेवर वरील वाक्याचा विचार करावा.

पिरांदेल्लो, आयनेस्को किंवा बेकेट यांचा ग्रेटनेस मला समजणे म्हणजे काय, तर तो ग्रेटनेस मी माझ्यात अवतरू देणे, जो ग्रेटनेस आम्हा चौघांपैकी कुणाच्याच मालकीचा असू शकत नाही. या क्षणी, आम्ही चौघेही आणि इतर सर्व ग्रेट कलावंत अप्रस्तुत नाही का होणार ? मी म्हणजे, इथे, कुणीही, ग्रेट कलाकृतीला सामोरा जाणारा. ०००

## <u>कलेतली महानता</u>

एका वाक्याने या विषयाला सुरुवात झाली. नंतर आणखी काही वाक्ये आली. ते सलग वाचणे गैरसोयीचे होत आहे असे वाटल्याने ही नोट केली आहे.

संगीत, लेखन, चित्र वगैरे माध्यमांतून खूप कलावंतांनी महान अभिव्यक्ती दिलेली आहे. या बाबतीत, हे वाचले का, ते ऐकले का असे श्रीमंती कमावण्याचे वातावरण तयार होऊ द्यावे का, असा प्रश्न पडतो. त्या महानतेवर त्या माध्यमांची अथवा त्या संबंधित कलावंतांचीही मालकी असू शकत नाही. ती महानता जे स्वतःत अवतरू देतील त्यांना इतक्या संपर्कांची काय आवश्यकता राहील, हा प्रश्न पडतो. महानतेची हाव का निर्माण होते, हाही प्रश्न इथे समोर येतो.

संगीतातली महानता आणि लेखनातली महानता या एकच असतात. खूप कलाकृतींतून महानतेला सामोरे जाणे आणि एका कलाकृतीतून महानतेला सामोरे जाणे यांत काहीही फरक नसतो. -- याच्या सत्यासत्यतेवर वरील विषयाचा विचार करावा.

पिरांदेल्लो, आयनेस्को किंवा बेकेट यांची महानता मला समजणे म्हणजे काय, तर ती महानता मी माझ्यात अवतरू देणे. ती महानता आम्हा चौघांपैकी कुणाच्याच मालकीची असू शकत नाही. त्या त्या वेळी तो तो कलावंत आणि मी आणि इतर सर्व महान कलावंत अप्रस्तुत नाही का होणार ? मी म्हणजे, इथे, कुणीही, त्यांच्या एखाद्या महान कलाकृतीला सामोरा जाणारा.

कलेच्या क्षेत्रात खूप अभ्यास असलेले, अनेक कलांचा व्यासंग असलेले असे बरेच लोक दिसतात. त्यामुळे, कला हे जणू काही विशेष ज्ञानाचे, काही हुशार लोकांचे राखीव क्षेत्र असल्याचा आभास तयार होतो. हे योग्य वाटत नाही.

एखाद्दुसऱ्या महान कलाकृतीच्या संपर्कात येणे शक्य असते, ते सांस्कृतिकदृष्ट्या पुरेसेही ठरू शकते आणि शेकडो महान कलाकृतींच्या संपर्कात येणे हे एखाद्या महान कलाकृतीच्या संपर्कात येण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे असते, असे काही नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. समीक्षेसाठी, त्या त्या कलाकृतीचे बारकावे दाखवून देण्यासाठी, अभ्यासाचा, व्यासंगाचा उपयोग होऊ शकेल, हे अर्थातच मान्य होण्यासारखे आहे.

कलेचे क्षेत्र सर्वांसाठी खुले असल्याचे स्पष्ट होणे गरजेचे वाटावे असे वातावरण जाणवते.

--- ००० ---

पहिल्या मुद्यासाठी ' राशोमान ' हे प्रख्यात उदाहरण आहे. एकच गोष्ट वेगवेगळ्या प्रकारे प्रेझेंट होणे. बाकीचे मुद्दे, शोध घेणे, डोक्याला ताप घेणे आणि कल्पनाशक्तीचा अभाव यांबद्दलचे आहेत. इथल्या तथाकथित विनोदी, उथळ आणि आपल्याला जे कळत / झेपत नाही त्याची टिंगलटवाळी करणे अशा संप्रदायाच्या लोकांनी मराठी लोकांना हे पटवूनच दिलेले आहे की तुम्ही रोजच्या व्यापातापांनी थकलेले आणि हलक्या डोक्याचे झालेले आहात, तुम्हाला किरकोळ करमणुकीव्यतिरिक्त इतर काहीच झेपणार नाही. बहुसंख्य मराठी लोकांनी आळसामुळे हे मान्यही केलेले आहे. त्यामुळेच इथे शक्यतो सगळे सवयीतलेच हवे आहे. जणू जगात इतरत्र जिथे सर्जक कला लोकांचे अवधान प्राप्त करते तिथे सर्व काही आबादीआबाद असून लोक व्यापतापांपासून मुक्त आहेत ! ०००

हवे ते करणे आणि हवे ते न करणे यांत हिंदकळणारी जगण्याची यंत्रणाच संशयास्पद झाली तर ? ०००

Octavio Paz यांच्या Across या कवितेबद्दल –

Closing my eyes... इथून ही कविता अचानक एकात्मतेच्या उंचीवर झेप घेते. स्वतः ब्लँक असणे आणि ' दुसऱ्या ' व्यक्तीचे विचार पार करून जाणे ! हा स्मृतिभ्रंश मृत नसून जिवंत आहे. विचारांना महत्त्वच नसलेली, भौतिकतेच्या मुखवट्याआडून पाहिलेली आणि बुद्धिगम्य नसलेली ही जगण्याची ' अदर साईड '. जणू निर्गुणाचे सगुणात रूपांतर !!! ०००

आपण इथे जसे एकमेकांना शुभेच्छा व्यक्त करतो तसेच हे एक सद्भावना व्यक्त करणे. एका संघटनेच्या मुखपत्रासाठी मी लिहून दिलेले संपादकीय ः --

<u>दीपावली शुभेच्छा</u>

दिसामाजी काही
तरी खरीदावे
मॉल ते फिरावे
निरंतर

वस्तूंकडे आता
मालकी देऊनी
स्वतःला विकोनी
खंक सारे

असा काळ आला
वेळ ना कुणाला
शब्द खर्चायाला
फुकाचाही

संवाद खुंटला
मनाने एकला
आतून भंगला
हरेक हा

संघर्ष वाढले
हिंसेचे थैमान
पाहुनिया मन
भांबावले

अशाही वेळेला
शुभेच्छा जागवू
विध्वंस थोपवू
जगातला

शांतीचे रोमांच
उभरोत मनी
अहंकार झणी
विलोपता

स्वतः दीप व्हावे
प्रत्येकाने आता
आनंदाचा दाता
प्रकाश हा
--- ००० ---

जग सुंदर वाटणे किंवा कुरूप वाटणे या आत्मकेंद्रित प्रतिक्रियांचा कंटाळा येऊन, तो भेदून लिहिल्या जाणाऱ्याही काही कविता आहेत ! एकेका व्यक्तीच्या प्रतिक्रियांना कलेच्या क्षेत्रात कितपत महत्त्व असणार ? तसे असेल तर भाषा अवगत असलेले सगळेच ग्रेट, असे म्हणावे लागेल ! प्रतिक्रियात्मक कला कितपत अर्थपूर्ण होऊ शकते ? ०००

कलेतल्या या प्रक्रियेबाबतचे माझे आकलन व्यक्त करणारे अनेक लेख मी लिहिलेले असून ते माझ्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. सगळ्यांनी आपापल्या प्रतिक्रिया महत्त्वाच्या मानल्यानेच एकूण गोंधळ, सडणे चालु नाही ? की प्रतिक्रियांचे काही आदर्श असे उगमस्थान असते आणि ते काही थोड्याच व्यक्तींना मिळालेले असते ? प्रतिक्रियांची कला दुसऱ्या ' व्यक्तींच्या ' जगण्यात कशासाठी प्रस्तुत वा अर्थपूर्ण ठरावी हा प्रश्न मला महत्त्वाचा वाटतो. संतकवींनंतर मला केशवसुत आणि आरती प्रभू ही उदाहरणे ' भेदण्याच्या ' संदर्भातली लक्षणीय वाटतात. नाघंची एखादी तुम्हाला महत्त्वाची वाटणारी कविता समोर घेऊन आपण सर्वांनी आपापले आकलन शेअर करणे, असे करता येईल. ०००

' प्रतिगामी विकास ' म्हणजे उच्च मध्यमवर्गीयांनी आता व्यक्तिगत विकास ' पुरे ' म्हणणे. त्याच मुलाखतीत सारामागोंनी ' चांगुलपणाची क्रांती ' ही एक स्वप्नवत वाटावी अशी कल्पनाही मांडलेली आहे. आणखी एक महत्त्वाचे म्हणजे हे जग आज जसे आहे त्याला ' नाही ' म्हणण्याचे महत्त्व ते सांगतात. एका ठिकाणी ते म्हणतात, " मी केवळ एक कादंबरीकार आहे. हे जग मला जसं दिसतं ते लिहून मी मोकळा होतो. माझं काम जगात परिवर्तन करणं हे नाही. " त्यांचे आणखी एक महत्त्वाचे वाक्य आहे ः -- " We can't accept truth coming from other people. We must always be able to question those truths. "

०००

धन्यवाद ! " जग परिपूर्ण नाही म्हणूनच कला अस्तित्वात येते " ! इतक्या थोडक्यात , महाग्रेटच म्हणायला पाहिजे ! तार्कोवस्की महान ! ०००

कुठलीही निवड ही मर्यादित आकलनावर आधारित अशीच असते. त्यामुळे, काही ' चांगले ', काही भ्रमनिरास असे असणारच. हे या ना त्या प्रकारे सार्वत्रिकच आहे. परंतु, व्यक्तिगत अनुभवांच्या उदात्तीकरणाला दुसऱ्या कुठल्याच व्यक्तीच्या आयुष्यात अर्थपूर्ण स्थान नसते ( दिसणाऱ्या यशाने, सुखाने मत्सरग्रस्त होणे वगैरे सोडून ). आपण कवितेच्या निमित्ताने अजूनही नवेनवे भ्रम तयार करतोय का, या प्रश्नाच्या चिंतनाशिवाय कविता इतरांना फारशी अर्थपूर्ण ठरत नाही. केवळ व्यक्तिगत अनुभवाची अभिव्यक्ती म्हणजे दुतर्फी करमणूक. अर्थात अशीही कला महत्त्वाची वाटणारे क्षेत्र उपलब्ध असतेच. ०००

अमुक काही मार्ग ( उदा. पूजाअर्चा ) न अवलंबणेच हिताचे या आकलनातून मी जगत असल्याने या कवितांवर मी प्रतिक्रिया न देणेच योग्य. ' नो कॉमेंटस ' हा राजकारणात धूर्तपणा असला तरी जगण्यातला एक अर्थपूर्ण प्रकार असू शकतो. मला सगळेच कळते अशा भ्रमाचीही मला गरज वाटत नाही. त्यामुळेच सगळीकडेच प्रतिक्रिया देण्याचा भिडस्तपणा टाळावा असेच मला वाटते. ०००

जगणे समजून घेण्याची प्रक्रिया असेल तरच धर्म, साहित्य, कला यांचे महत्त्व, अन्यथा, गणेशोत्सव आणि साहित्यसंमेलन यांत काहीही महत्त्वाचा फरक नाही. तिकडे धर्माची धुंदी, इकडे साहित्याची धुंदी ! एकदा रममाण होण्याचे असे मानसिक साचे तयार झाले की किरकोळ, फुटकळ विनोदाशिवाय काही कळणेही बंद होते. ०००

लेखनाचे कौशल्य आत्मसात केलेले व्यक्तिमत्व, ते कौशल्य वापरायच्या, दाखवायच्या संधी शोधत असते. चिंतनाच्या बाबतीत चिंतनशीलता असते पण ' चिंतनशील व्यक्तिमत्व ' नसते कारण चिंतनशीलता ही प्रवाही असते. त्यामुळे वापरणे, दाखवणे, वाहवा मिळवणे यांचा इथे संबंधच नसतो. उथळ लेखक जसे सुचायच्या प्रतीक्षेत असतात तसे चिंतनशीलतेत नसते.

ज्ञानेश्वरांना ' अमृतानुभव ' सुचला किंवा काफ्काला ' ट्रायल ' सुचली, असे म्हणतानाच खटकते ते का, हे पाहावे. चिंतनशीलता ही अनेक प्रकारे व्यक्त होत असते आणि सांस्कृतिक दृष्ट्या ते महत्त्वाचे आहे, हे कुणालाही मान्य व्हावे असेच आहे. ०००

वस्तू, माणसे, निसर्ग इत्यादींशी असणारे संबंध समजत राहण्याच्या प्रक्रियेत जगणे म्हणजेच चिंतनशीलता, म्हणजेच संस्कृती. याच्या अभावात विकृती, ताण, दुःख. इथे आर्थिक फायद्याचा प्रश्न नसून जगण्यातल्या तोट्याचा प्रश्न आहे. हा तोटा, सगळा आर्थिक फायदा मातीमोल करू शकतो. करतोच आहे. या अर्थाने आर्थिक फायद्याशीही याचा संबंध आहे. हे लक्षात घेऊन, आता मी चिंतनशील होतो, असे म्हणून, फायद्यासाठी, कुणी चिंतनशील होऊ शकत नाही, ही यातली गोम आहे. ०००

<u>तोडगा</u>

लोकशाही पद्धतीने ऐतिहासिक सत्याबाबतचे निर्णय घेता येतील असे समजणे फारच बावळटपणाचे ठरेल. एक तर नवे पुरावे आल्यावर इतिहास बदलावा लागतोच, शिवाय प्रत्येक सत्तापालटाच्या वेळी इतिहास बदलुन आपला वेडेपणा चव्हाट्यावर मांडत बसावे लागेल. प्रत्येक वेळी शालेय पुस्तके मागे घेणे, नवी पुस्तके लिहवून घेऊन ती वितरीत करणे हेही खूप त्रासाचे, जिकीरीचे आणि खर्चाचे होईल. त्यापेक्षा, लोकशाही पद्धतीला धरूनच एक अधिक चांगला मार्ग सुचतो, तो इथे देत आहे. लोकशाहीत आपण निरनिराळ्या विचारसरण्या, निरनिराळे पक्ष यांना स्वातंत्र्य देत असतोच, त्याच पद्धतीने, निरनिराळ्या विद्वानांना जे वेगवेगळे पुरावे ग्राह्य वाटतील त्याप्रमाणे वेगवेगळे इतिहास लिहिण्याचे स्वातंत्र्य ठेवावे. ज्या त्या शाळेने आपापले विचारस्वातंत्र्य वापरून आपल्या शाळेत कोणता इतिहास शिकवायचा ते ठरवावे. एखादी शाळा, कोणत्याही घटनेचे सत्य शोधता येते, हा कसा माणसाचा एक भ्रम आहे, ते विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी हे सगळेच इतिहास वापरू शकेल. त्यामुळे, समाजात, ऐतिहासिक सत्याबाबत वेगवेगळ्या भूमिका घेणाऱ्यांबरोबरच, या सगळ्याच भूमिका मूर्खपणाच्या आहेत अशा आकलनाचाही एक गट राहील. वैचारिक, मानसिक तब्येत बरी राहण्याबरोबरच, या खुल्या वातावरणाच्या प्रभावामुळे भावना भडकण्याचे प्रमाण कमी होईल अशी आशा बाळगायला वाव राहील. एका विद्वानाने ( बहुतेक रसेलने, आत्ता माझ्याकडे अचूक संदर्भ नाही, त्याने काही फरकही पडत नाही. ) असे सुचवले होते की बऱ्याच वर्षांपूर्वीची वर्तमानपत्रे घेऊन ती एखाद्या विषयावर कसे वेगवेगळे लिहीत होती हे विद्यार्थ्यांना दाखवावे म्हणजे आजची वर्तमानपत्रे कशी वाचायची हे त्यांना कळेल. इथे सुचवलेल्या तोडग्यातून इतके सगळे चांगले होईल न होईल, पण, आपल्या आवडत्या इतिहासावर आधारित आपली आयडेंटिटी तयार करून ज्यांना आपले पूर्ण आयुष्य जगायचे आहे, त्यांची सोय तरी होईल. असे जगण्याचा हक्क खरे तर मानवी हक्कांतच घेतला पाहिजे. हा साधा हक्क नाकारून लोकांना दुःखात जगायला लावणे हे कोणत्या लोकशाहीत बसते ? या अशाही लोकशाहीवादी विचारांना घटनेने स्वातंत्र्य दिलेलेच आहे ना ? नसेल दिलेले तर घटना बदलायला हवी. शांतता आणि शहाणपणा यांच्यासाठी हे का करू नये ?
०००

पन्नास वर्षांपूर्वीच्या घटनांना इतिहास म्हणायचे ही मान्यता बदलुन आता तीस वर्षांपूर्वीच्या घटनांना इतिहास म्हटले जाते. काळाच्या वेगामुळे असेल. या मान्यतेप्रमाणे ' आणीबाणी ' ही ' इतिहास ' ठरते. सगळे उपलब्ध ऐतिहासिक पुरावे लक्षात घेऊनही आणीबाणीचा ' सत्य ' इतिहास लिहिता येईल ?

पूर्वी " भविष्य घडवा " असे म्हणायचा एक काळ होता, आता, ( भूतकाळात शिरून ) " इतिहास घडवा " असे म्हणायचा काळ आलेला आहे ! जगण्यातल्या ॲब्सर्डिटीकडे पूर्ण दुर्लक्ष करणारेच एकूण मानवी अस्तित्वाची वाट लावत राहतात ! कुठल्याही इतिहासाशी आयडेंटिफाय होऊन जगण्यासारखी ट्रॅजिक आणि विध्वंसक अवस्था नाही ! ०००

घराणे, जात, धर्म, भाषा, सुखदुःखे, मानापमान, महत्त्वाकांक्षा, सूडभावना अशा सगळ्याच गोष्टींना चिकटून चालु असते जगणे. आता मी जातीचा अभिमान सोडतो, आता धर्माचा सोडतो, आता मार्क्सिझमचा सोडतो, असे कसे होऊ शकेल ? यांतले काहींना काही मिळून मीच असतो ! मीच मला पूर्णपणे सोडणे म्हणजे अध्यात्माचा विषय होतो ! त्याज्य !

म्हणूनच, माझ्या कॉमेंटचा उरलेला भाग काय तर -- असेच जगू या, असेच मरू या, जमेल तसे आणि जमेल तेवढे ! ( पुरोगामित्व, स्वातंत्र्य वगैरे गप्पा चालुच ठेवायच्या ! )

थोडा थोडा बदल होतो, या, त्या क्षेत्रात, पण, दुफळीचा, माणसांतल्या विदीर्णतेचा, गटातटांचा, त्यांतल्या संघर्षांचा मूळ प्रश्न असा हळूहळू सुटत नाही; कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तो तसाच राहतो आणि याचे कारण माणसाची जगण्याची अलगतावादी पद्धत हेच आहे, असे मला सुचवायचे आहे. समजा हा बौद्धिक क्षेत्राच्या बाहेरचा प्रश्न आहे, असे लक्षात आले तर लगेच, ' अध्यात्म ! अध्यात्म ! ' म्हणून फेटाळण्यात अर्थ नाही. उदाहरणार्थ, राष्ट्रवाद तसाच ठेवून ' एक जग ' होऊ शकत नाही. त्यामुळे, हळूहळू सुधारणा ही आत्मवंचनाच ठरते. यात नकारात्मकतेचा प्रश्न नाही. जे आहे ते आधी समजून तर घ्यायला हवे ! कुठे कुठे सुधारणा आहे, पण, एकूणात सगळे अधिकाधिक सडत का चालले आहे ? मानवी मनाची कामाची पद्धत अलगतावादी असेपर्यंत सत्ता, स्वार्थ, विषमता, अन्याय, हिंसा यांत फरक पडणार नाही, हे स्पष्ट आहे.

पूर्वी, माझ्या आठवणीप्रमाणे, मोरारजी देसाई लोकांना म्हणाले होते, ' निर्भय बनो ' ! छान होता की सल्ला ! का नाही बनू शकले लोक निर्भय ? अलगतेत ( isolated ) असेपर्यंत असे ' चांगले ' सल्लेही जगण्यात अवतरणार नाहीत. लोक निर्भय बनले तर सगळी विषमता संपुष्टात येऊ शकेल. पण ... त्यामुळे, काय केले पाहिजे, या प्रबोधनाचा फारसा उपयोग नाही. मनाच्या अलगतेतच जगणे अपरिहार्य आहे का, हा खरा प्रश्न आहे, जो कधीही विचारायचाच नाही, हे आपले पक्के ठरलेले आहे ! त्यामुळे सगळा कळवळा वाया जातो ! मित्रांनो, मैत्रीतली चर्चा आहे, मलाही कुठलाही अधिकार नाही ! पण, कोण असू शकतात अधिकारी ?

उलट भयग्रस्त असल्यामुळे बजबजपुरी माजलेली आहे. अलगतावादी जगणे म्हणजेच भीतीचा रोग पत्करणे. आणि इतर सगळे प्रश्नही स्वीकारणे. यात हळूहळू बदल शक्य नाही. आता मी कमीकमी अलगतावादी होत जातो, असा.

काल्पनिक बोलुन फारसा उपयोग नाही. मानवी कृतींतून होणाऱ्या विध्वंसाच्या प्रलयाची आत्ताच आपण वाट पाहतोय असे खूपजणांना वाटतेय, ही वस्तुस्थिती आहे. ज्यांना आहे असेच त्यातल्या त्यात सुधारणा करत रेटायचे आहे त्यांना प्रचंड आशावाद टिकवता येवो, अशी सदिच्छा व्यक्त करून मी सध्या आपला निरोप घेतो. ०००

( एकाने दिलेली समीक्षेची तत्त्वे वाचून -- ) अशा विवेचनाला ' अध्यात्मिक ' आणि ' निरर्थक ' म्हणायचा ट्रेंड आहे. हे लक्षात घेऊन असे मुद्दे पुराव्यांसह चर्चिले गेले पाहिजेत आणि कलाक्षेत्रात बुद्धिप्रामाण्यवाद कुठे थिटा पडतो ते दाखवले गेले पाहजे. ०००

मृत्यूची भीती म्हणजे आहे ते नाहीसे होण्याची भीती. तो येईपर्यंत आहे ते नाहीसे होण्याचा प्रश्न नाही आणि तो आल्यावर ते नाहीसे झालेले कळायचा प्रश्न नाही ! सारांश, आहे ते कधीच नाहीसे होत नाही !

वेदना हा वेगळा मुद्दा वाटतो. शिवाय तो मृत्यूशी संलग्न असतोच असे नाही. खूपजणांना अनिर्वेदनीय मृत्यू मिळतो. मन चालु असताना बसणारे धक्के-चपेटे तर एक प्रकारे ' माहितीचे ' असतात. त्यातला एखादा सहन न होणे, उन्मळून पडणे, मरणे, हे वेगळे. तिथे कदाचित ' सुख ' चालु राहण्याचा प्रश्न असेल. ते सगळे काहीही असो, ' मृत्यू ' या विषयावर अशी दिलखुलास चर्चा होण्यासारखा आनंद नाही !

म्हणजे, जगण्यातली परिपूर्णता याचा अर्थच मृत्यूची भीती नसणे असे दिसते !

जगण्यातल्या अपूर्णतेबद्दल जे बोलणे आहे ते म्हणजे ' मृत्यूच्या आकलनाच्या ' अभावातले जगणे असे म्हणता येईल. ' आपुले मरण पाहिले ' इथे आपण असे येऊन पोचलो !

जगण्यातला कंटाळवाणेपणा, अपुरेपणा, वैताग, विदीर्णता, हिंसा, अराजक, विषमता, अन्याय, अत्याचार, युद्ध, विध्वंस, दुःख, छळ, पीडा यांचे उदात्तीकरण करता येईल ? आणि डावपेच, वर्चस्व, कुरघोडी, एकाकीपणा, वैफल्य, सूड, आत्महत्येचे विचार – यांचे ?  आणखीही काही असेल. हे सगळे असल्याशिवाय जगण्यात काय मजा आहे, असे म्हणता येईल ? आणि हे वगळले तर काय उरेल ? मृत्यूचे आकलनच ! ०००

समजा एका ठिकाणी माझे पोस्टिंग आहे, तिथून बऱ्याच अंतरावर माझे कुटुंब आहे आणि तिथे काही समस्या आहे, मी रजा घेऊ शकत नाही, माझी जवळ कुठे बदलीचीही शक्यता नाही -- असा नियतीचा बंदोबस्त अनेकांच्या आयुष्यात येतो. प्रत्यक्षात यावर मार्ग निघणे, होईल तेव्हा होईल, तोवर मानसिक प्रश्नाचे काय ?

प्रश्नाचा रोख असा आहे की, परिस्थिती अशी असण्याऐवजी तशी हवी होती, पण, तसे नसल्याने एक मानसिक त्रस्तता किंवा ताण असणे. आता व्यवहारात तो प्रश्न सुटेल तेव्हा सुटेल किंवा सुटणारही नाही. पण, मी इथेच आहे, मन इथेच आहे, ताण इथेच आहे -- हा प्रश्न इथल्या इथे का सुटू नये ?

मनाचा एखादा क्षण, बाह्य कारणे, परिस्थिती यांपासून मोकळा असू शकतो की नाही, असा हा प्रश्न आहे. ०००

सत्तेचा, पैशाचा जसा माज आणि गैरवापर असतो तसाच तो विद्वत्तेचाही असतो. समीक्षेतही उपरोध वापरणे, टिंगलबाजी करणे, वगैरे. अत्यंत कोत्या निकषांच्या आधारावर नेमाड्यांनी खानोलकर / आरती प्रभू, पु. शि. रेगे यांना फालतू लेखक ठरवले. याचा अर्थ त्यांनी ते व्यक्तिगत आकसाने केले असेल असे नव्हे. त्याच पद्धतीने, व्यक्तिगत आकसाशिवाय, काहीजण त्यांच्याहीबद्दल असे बोलताना दिसतात. एकदा शेरेबाजी सुरू झाली की ती परवानगी सगळ्यांनाच द्यावी लागते. पण त्यातून काही सापडणे इतरांना अवघड जाते हे खरेच आहे.   ०००

प्रत्येक चर्चेतून काहीतरी अंतिम निष्कर्ष निघावा असे नाही. माणसाच्या जगण्यातल्या प्रश्नांना सामोरे जाण्याची एक प्रक्रिया असे चर्चेचे स्वरूपही अर्थपूर्ण ठरेल. ०००

ललित लेखनाच्या बाबतीत मी काही सुचवू इच्छितो. खपणारे लेखक आणि न खपणारे लेखक असे दोन विभाग करावे. खपणाऱ्या लेखकांची पुस्तके काढावी आणि बाकीच्यांना नेटकडे पाठवावे. हजारभराची आवृत्ती दहा दहा वर्षे खपवत बसण्यात काही अर्थ नाही. थोडेसे गुणवत्तेच्या अंगाने ते असे असेल ः -- वाईट लेखनाची पुस्तके होतील; अत्यंत वाईट, बरे आणि चांगले हे नेटवर जातील. विचक्षण वाचक त्यांना पाहिजे ते घेतील. या कामासाठी अगदी फार मोठी समिती लागेल, असेही नाही.

वरील विवेकशील वर्गीकरणात, ' वेळोवेळी संबंधितांना वाटणारे अपवाद वगळता ' असा एक शब्दसमुच्चय वाढवायला हरकत नाही. नाहीतरी ही काय अधिकारशाहीची व्यवस्था थोडीच असणार आहे ? हे अंमलात आणण्यासाठी चाललेले नसून या निमित्ताने आपण आपली अवस्था समजून घेत आहोत. कुणीही कोण असली शिस्त लावणारे ? ०००

मी इतरांचे मुखवटे फाडायला निघालो आहे -- हा माझाही एक मुखवटाच असतो की नसतो ?

आपला भावनिक, वैचारिक, नैतिक, तात्त्विक वगैरे मिळून जो साचा / नमूना तयार झालेला असतो त्यातून हेतूपूर्वक घेतलेली एक पोझ, एक पवित्रा म्हणजे मुखवटा. हे मुखवटे असंख्य प्रकारचे असू शकतात आणि आदर्श मुखवटा कुठला हे प्रचंड विवाद्य असते.

कधी, कुठली, किती भावना ' एकदम उसळून ' यावी हे त्या त्या मुखवट्यावरच अवलंबून असते. शून्य पोकळीतून  ' एकदम उसळून ' काय येणार ? धर्म म्हणजे एकविध ( एकात्म ) मन -- हे तुकारामाचे सांगणे इथे लक्षात घ्यावे.

अंतर्मन, बहिर्मन यांतली तफावत तसेच समाजाच्या नीतीकल्पना आणि वागणे यांतली तफावत, त्याचप्रमाणे असणे -- दिसणे / होणे, उपदेश -- वागणे, धर्म -- वागणे, दुसऱ्यांच्या अपेक्षा -- माझे असणे अशा हजारो कारणांनी मन विभक्त असते. असे मन हे नेहमी टक्केवारीतच खरे वा खोटे

असते. माणसाला असेच जगायची सवय आहे. क्वचितच कधी मन एकात्म असते .पण लगेचच ते आपल्या विदीर्णतेत परतते. त्यामुळे, माणसांचे जग हे मुखवट्यांचे जगच असते. असेच जगणे भाग आहे का, हा प्रश्नही विचारला जाऊ नये, असा या पॅटर्नचा बंदोबस्त असतो. ०००

**<u>फुलपाखराचे पंख</u>**

-

इकडे फुलपाखराने पंख फडफडवले  की तिकडे हजारो किलोमीटर दूर असलेल्या नदीला पूर येतो, अशा अर्थाची एक म्हण (की काय) वाचनात आली होती. मला ही नुसती एक गंमत वाटत नाही. समजा मिशेल आणि ओबामा यांचा एखाद्या दिवशी कडाक्याचा वाद झाला तर त्याचे जागतिक परिस्थितीवर काहीच परिणाम होणार नाहीत ? ओबामा तर समजा सर्वोच्च सत्ताधीश आहेत. त्यांचा जगातल्या सगळ्याच सत्ताधीशांवर परिणाम होत असतो. पण तसेच उलटेही खरे असते. जगातल्या इतर सत्ताधीशांचा त्यांच्यावरही परिणाम होत असतोच. याच पद्धतीने सगळ्याच मानवी संबंधांतले सत्ताधीश सतत एकमेकांवर परिणाम करत असतातच. आणि कोण सत्ताधीश हे विवाद्य असलेले संबंधही या एकूण संबंधक्षेत्रावर आणि कृतिक्षेत्रावर परिणाम करत असतातच. हे पाहता, एकूणात, ही वेगवेगळी मने नसून हे एकच मानवी मन अभेद्यपणे स्पंदत असते असे दिसते. एका माणसाच्या मनात जशी अहंकाराची, अस्मितेची -- कौटुंबिक, भाषिक, धार्मिक, वैचारिक अशी अनेक केंद्रे असतात तशीच त्या एका मानवी मनातही असतात. शरीरे वेगवेगळी पण एकच मन !

व्यक्तीच्या, समाजाच्या जगण्यात जसे काही ‘ चांगले ‘ घडत असते पण एकूणात सडणेच चालु असते; एकाकीपणा, विदीर्णता, हिंसा यांत वाढच होत असते; त्याचप्रमाणे, या एकमय स्पंदणाऱ्या मनाचेही चालु असते. सडत जाणे आणि अस्वस्थ होत अधिकाधिक एकाकी होणे. प्रश्न असा येतो की या जागतिक सडण्याच्या प्रक्रियेवर अक्सीर इलाज काय ? कुणाचेही मन या परिणामयंत्रणेच्या एकमय स्पंदनाचा भाग असेपर्यंत प्रत्यक्ष जगण्यात वेगळे असे काही घडणे शक्य नाही. म्हणजे, या अशा एकमयतेतून एखादे अस्तित्व बाहेर पडले तरच ही प्रक्रिया खंडित होऊ शकेल.

माझ्या मनाने अशा स्वातंत्र्यात पंख फडफडवणे हाच तर या जागतिक समस्येवर इलाज नसेल ? तुकाराम जे म्हणतात की
‘ आघातावेगळा / असे ठाव हा निराळा // ‘  तेच तर हे नसेल ? ( आघात म्हणजेच परिणाम ! )

-- ०० –

पिकासोच्या एका चित्राबद्दल  --
वाचताना तंद्रीत गेलेली तरुणी. पुस्तक मांडीवर आहे आणि हात खुर्चीच्या हातांवर आहेत. म्हणजे आता पुढे वाचण्यापेक्षा चिंतन अधिक महत्त्वाचे आहे, हे स्पष्ट आहे. रंगांची गुंतागुंत नाही. एकूण चित्र चिंतनशीलतेचा साधेपणा व्यक्त करणारे. हिरवा, लाल, पिवळा हे रंग पाने, फुले, वेली यांचा ताजेपणा, जिवंतपणा दाखवतात. तिचा स्तन तिची पक्वता दाखवत असला तरी उत्तान नाही. जगण्यातल्या अत्युच्च अर्थपूर्णतेच्या क्षणाचे हे चित्र वाटते. आकार लयदार, छान आहेत. त्यांतही सहजता, साधेपणा जाणवतो. ०००
इतर वाचन आपण गरजेप्रमाणे करत असतो, तुमचा प्रश्न मला मुख्यतः ललित वाचनाबद्दल आहे असे वाटते. अशा वाचनासाठी आयुष्यभरात एकूण उपलब्ध असणारा वेळ आणि  ' वाचनीय ' मजकूर याचा अंदाज घेता आपण खूपच कमी वाचणार आहोत, हे स्पष्ट आहे. त्यातही, मराठी,

हिंदी आणि इंग्लिश. त्यामुळे, काही चांगले लेखक ठरवून त्यांचे शांतपणे, समजून घेत, त्यासाठी लागेल तो वेळ देत वाचत राहावे, असे वाटते. पुस्तकांची संख्या वाढवण्याला फार महत्त्व देऊ नये आणि वाचन कमी होते आहे याचे ताण निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्यावी. चांगले वाचायचे असेल तर त्या त्या वेळी पूर्णपणे त्याकडेच लक्ष देणे योग्य होईल.

००० --- ०००

--- चं. प्र. देशपांडे.

मो. ९३७१००५७७३. ईमेल – champrade@gmail.com संकेतस्थळ – www.champralekhan.com

# हिंदुत्ववादी, इतिहासप्रेमी आणि सामाजिक बांधिलकीवाले

**-- चं. प्र. देशपांडे.**

एफबीची नैतिक, कायद्याची बाजू माहीत नसल्याने, एफबीवर झालेल्या चर्चांमधलीही फक्त माझीच वाक्ये इथे घेतली आहेत .

एफबीच्या वापराबाबतच्या चर्चेत --

या निमित्ताने एफबीवर काम करताना येणारे विचार नोंदवतो ः --

१. नवीन / हौसेने लिहिणाऱ्याला नाउमेद करू नये.

२. आपण कितीही शहाणे असलो तरी सारखे खरे मतभेद नोंदवून मित्रांना बोअर करू नये.

३. शक्यतो मैत्रीचे वातावरण बिघडवू नये.

४. सगळीकडेच उपस्थित राहू नये.

५. आपल्याला इंटरेस्ट नसलेल्या चर्चेत बळेच भाग घेऊ नये.

६. जात, स्त्री-पुरुष हे भेद डोक्यात न ठेवता कॉमेंटस द्याव्यात.

७. आवश्यक तिथे झाकली मूठ ठेवावी. भिडस्तपणा करू नये.

अनेक मुद्दे निघाले, त्यांचे आणखी काही वेगळे पण चांगलेच अँगल्स लक्षात आले. यांत समन्वय साधत, अधिक-उणे करत, किंवा हे संपूर्ण नाकारून एखाद्या नव्याच समजुतीने ज्यालात्याला वावरता येईल, हाच सारांश समजू. मैत्रीपूर्णता राहो हीच सदिच्छा !

मतांचा आग्रही पाया असण्यापेक्षा दोन वा अधिक व्यक्ती एकत्रितपणे काही समजून घेऊ इच्छितात, एकमेकांशी बोलतात आणि निष्कर्षाबाबत चिंता करत नाहीत, अशा संभाषणाला मैत्रीचे संभाषण म्हणावे असे मला वाटते. भावनिक अवलंबित्वाला मैत्री म्हणायची व्यवहारात सर्वमान्य पद्धत दिसते, त्याला मी मैत्री समजत नाही....

<u>लालबाग परळ.</u>

**‘ लालबाग परळ ‘** हा चित्रपट परवा बघितला. जयंत पवारांच्या ‘ अधांतर ‘ या नाटकावर आधारित हा चित्रपट आहे.

१.गिरणीकामगारांवर झालेल्या अन्यायाबाबतच्या या चित्रपटाची सुरुवात झकास लावणीने होते. ( अहो, चित्रपटात लागणारच हे ! आणि पुढे कुठे लावणीला जागा करणे अवघड आहे. )

२. चित्रपटात सेक्स व हिंसा यांचे प्रमाण बऱ्यापैकी आणि आकर्षक आहे.

३. चित्रपट संपाच्या प्रश्नाला फारसा हात लावत नाही.

४. जुन्या हिंदी सिनेमांतल्याप्रमाणे भांडवलदारांची किरकोळ व्हिलनिश दृश्ये आहेत.

५. प्रश्न चिघळत जाण्याची प्रक्रिया न दाखवता नुसते परिणाम दाखवले आहेत.

६. ‘ रशिया कोलमडला तिथे आपले काय ! ‘ किंवा ‘ या भांडवलदारांशी टक्कर घेणे अवघड आहे ‘ अशा अर्थाची डाव्यांच्या दृष्टीने पराभूत म्हणावीत अशी वाक्ये या चित्रपटात आहेत. म्हणजे गिरणीकामगारांबरोबरच एक मराठी लेखकही भांडवलशाहीने खाल्ला, असे म्हणावे की काय !

७. सगळ्या प्रश्नांची उत्तरे देऊन, सूड वगैरे घेऊन मगच चित्रपट संपतो !

८. चीड, करुणा, उद्वेग, कीव अशा भावनांचा प्रेक्षकांना फारसा त्रास होऊ नये याची काळजी घेण्यात आलेली आहे.

९. बाकी एकूण चित्रपट सफाईदार, छान आहे.

१०.कुठल्याही विषयातून करमणूक उभी करता येते हे मान्य, पण मग ऑस्कर कधी मिळणार ?

<u>बाकी शून्य</u>

विश्या म्हणाला, “ ब्रम्ह म्हणजे तुझं डेथ वॉरंट, रांडेच्या. ह्या अध्यात्म, देवदेवस्कीच्या नादानं कोणाचं कधी भलं झालेलं नाही. “
मी म्हटलं, “ हे अध्यात्म नाही, तत्त्वज्ञान आहे. “
विश्या म्हणाला, “ तत्त्वज्ञानाविषयी मला एकच गोष्ट माहीत आहे. A philosopher is like a blind man in a dark room, looking for a black cat which is not there. माझ्या संदर्भग्रंथात याची नोंद आहे. आणि रांडेच्या, तत्त्वज्ञान सांगणारा  मनुष्य मोठा होतो. तत्त्वज्ञान ऐकणारा आयुष्यातून उठतो. “
मग मी तत्त्वज्ञान ठेवलं आणि मराठी साहित्य वाचायला घेतलं . ( कादंबरी पृष्ठ ४२१. )
---  कमलेश वालावलकर यांची ‘ बाकी शून्य ‘ ही कादंबरी अलीकडेच वाचली. मला ही एक अपवादात्मक चांगली कादंबरी वाटली. तरुण वयातल्या जगण्याचा आवाका घेणाऱ्या ‘ वासूनाका ‘, ‘ कोसला ‘ अशा कलाकृतींचा खूप बोलबाला आहे. त्यांहून मोठी आव्हाने ही कादंबरी घेते. केवळ बुद्धीच्या अंगाने आयुष्य जगणाऱ्या एका तरुणाचे एक टोक गाठणारे हे आयुष्य आहे. इथे नुसती वर्णनात्मकता नसून या प्रक्रियेतल्या मूलभूत प्रश्नांशी झटापट आहे. जगण्याच्या एका साच्याचा ठसा देण्यापेक्षा जगणे अनेक तऱ्हांनी पाहण्याची इथली समज अद्वितीय आहे !

तात्त्विक, अध्यात्मिक प्रश्नांची जाणीव बुद्धीलाच होणार, हे सरळच आहे. या लेखकाला ते भान वारंवार येताना दिसते. पण बुद्धीच अंतिम असे झाले तर ती एका ब्लॅक वॉलवर धडका घेत राहते हे, आकलन म्हणा की अनुभव म्हणा, व्यक्त करणारी ही महत्त्वाची कादंबरी आहे.

सर्व तऱ्हेच्या भ्रष्टाचाराचे उगमस्थान कोणते ? आपली सर्वांची सडकी मने ! त्याबाबत स्वतःला प्रश्न विचारले पाहिजेत. त्यात कुणाला इंटरेस्ट नाही. नुसती सिस्टिम बदलुन जगणे चांगले होईल यावर माझा विश्वास नाही. मग काय बोलणार ?

उत्तर दिलेलेच आहे. दुःखातच जगले पाहिजे का, अपमानांच्या जखमांतून सुटका नाही का, वर्चस्वाची इच्छा पिच्छा का सोडत नाही, एकाकीपणा का येतो -- अशा प्रश्नांचा प्रत्येकाने आणि जास्तीत जास्त लोकांनी शोध घेणे, हा एकच मार्ग आहे. याचा माणसाच्या जगण्यावर प्रचंड प्रभाव पडेल. कायदे कसे असावे आणि शिक्षा कशी द्यावी हाच फक्त आपण विचार करतो आणि प्रामाणिकपणाची, सगळ्यांना माहीत असलेली तत्त्वे घोकत राहतो. पॅचवर्क करत आयुष्य संपवणे हेच प्रत्येकाचे ध्येय आहे. त्यामुळेच कामचलाऊपणाचा रोग फोफावतो. हे उघड दिसत असूनही कुणी पाहू इच्छित नाही !

## कलेचा ( साहित्याचा ) परिणाम.

कलेचा समाजावर चांगला वा वाईट परिणाम होतो का, अशी चर्चा एफबीवर एका ठिकाणी पाहिली. यावर जरा सविस्तर नोटच द्यावी असे वाटले. खूप मोठमोठ्या, मौल्यवान कलाकृती मराठीत आणि जगातही इतरत्र निर्माण झालेल्या आहेत पण त्यांमुळे माणसात काही बदल झाला आहे असे म्हणता येत नाही, हा चर्चेतला एक सूर दिसला. कृष्ण, ख्रिस्त, महंमद, बुद्ध आले-गेले तरी काय फरक पडला, असा, एकूण कलेलाही लागू पडणारा मथितार्थ. कितीही, काहीही ' मौल्यवान ' घडले तरी माणूस हिंसक, फुटीर, दुःखीच राहात आलेला आहे, हा सारांश. याचबरोबर येणारा प्रश्न म्हणजे, करमणुकीव्यतिरिक्त कलेचा उपयोग काय ? – हा. या बाबतीतले आपले आकलन मित्रांच्या चर्चेसाठी समोर ठेवावे असे वाटल्याने ही नोट. हा प्रश्न, माणूस स्वतः नीट का जगू शकत नाही आणि माणसे एकमेकांशी वाईट ( संघर्षमय ) का वागतात, या दोन समस्यांशी निगडित आहे, असे मला वाटते. काही मुद्दे : --

१.आपण जेव्हा कला ( साहित्य ), धर्म, तत्त्वज्ञान यांबद्दल असे काही प्रश्न विचारतो तेव्हा विचारसरणी, राजकारण, वगैरे बौद्धिक गोष्टीही अपयशीच ठरलेल्या आहेत, हे विसरून चालणार नाही.

२. कशाचाच काही उपयोग नाही, अशा डार्क निराशावादाचाही काही उपयोग नाही, हे उघडच आहे.

३. मौल्यवान साहित्याचा वाचक जगभर कमीच असतो.

४. मौल्यवान साहित्य हे एखाद्या विचारकृतीसारखे एकरेषीय नसते. त्यामुळे त्याचे ' याचा हा ' असे परिणाम दाखवता येत नाहीत. 'बीज भाजून केली लाही ' अशी ओळ तुकारामाने लिहिल्यानंतर महाराष्ट्रात लाह्यांचा दर्जा सुधारला असे दिसत नाही.

५. मौल्यवान साहित्य हे मनाच्या सर्वसामान्य सवयीला आव्हान देणारे असते, त्यामुळे, सवयीतल्या आडाख्यांत त्याचे परिणाम दाखवता येत नाहीत.

६. जिथे कुठे मानवी मन मौल्यवान साहित्याच्या संपर्कात येते तिथे त्या साहित्यात अंतर्भूत असलेले जगण्याचे आकलन झिरपते. मानवी मनांचे सतत एकमेकांशी संपर्क होत असल्याने हे आकलन एकूणच जगण्याची अर्थपूर्णता समृद्ध करते.

७. एरवी, सवयीच्या जगण्यात, कधीच शक्य नसलेले आकलन असे अस्तित्वात आल्याने माणसाचे जगणे परिपक्व होते.

८. सवयीत सर्जकता नसते. सवयीबाहेर झेपावणारी साहित्यकृती सर्जक असते. सर्जकता हे श्रेयस असते. कारण तिथे आकलनाची एकात्मता असते.

९. विचाराने हे कळले नाही तरी अप्रत्यक्षपणे माणसाला हे जाणवत असल्यानेच सर्जकतेचा शोध होत राहतो.

१०. एकरेषीय, आणि त्यामुळेच संघर्षमय आणि विदीर्ण, जगण्याने येणारी विध्वंसकता असह्य होणे अटळ असल्याने सर्जकतेचे महत्त्व अबाधित राहते.

सध्या, चर्चेसाठी एवढे मुद्दे पुरेत.

--- 000 ---

प्लेटोच्या दृष्टीने कवी हा निरुपयोगी नव्हे तर अहितकारक होता. कवितेमुळे माणूस त्याच्या अस्तित्वाच्या, भावनिक सुखासीनतेच्या हीन पातळीवर पोचतो असे त्याचे म्हणणे होते. अरिस्टॉटलने हे अमान्य करत कॅथार्सिसचा -- शुद्धीकरणाचा मुद्दा मांडला. प्लेटोच्या म्हणण्यात तथ्यच नव्हते, असे मला वाटत नाही. ' अहित ' कृत्रिमपणे नियंत्रित होऊ शकते का आणि तसा प्रयत्न करावा का याबाबत आपले खूपच वेगळे आकलन असेल.

**मौल्यवान कला ही बोधप्रद असते का / असली पाहिजे का, असा एक मुद्दा इथे येतो. अनेक प्रकारे बोधप्रदता लहानपणापासून हॅमर होतच असते, त्याचे दृश्य परिणाम कमी दिसतात हे खरेच आहे. पण, मला वाटते, बोध, त्याचे परिणाम, परिणामांची संख्या वा प्रमाण, असा विचार करणे या बाबतीत फारसे अर्थपूर्ण ठरणार नाही. तुकारामाच्या काही लक्षात येणे आणि सर्वांसाठी ते अभिव्यक्त करावे असे त्याला वाटणे याचे महत्त्व, ते समजून घेणारे लोक किती आहेत यावर ठरू नये. सर्जकता ही कुणासाठी आरक्षित नाही आणि बहुसंख्यांना तिचे महत्त्व जाणवते, फक्त या गोष्टीला अग्रक्रम द्यायचा क्षण बहुतेकांकडून सारखा टोलवला जातो. वर नोटमध्ये दिलेल्या कारणांनी, परिणामाची मोजदाद करता येणार नाही आणि कलेचे व्यावहारिक फायदे-तोटे ठरवता / दाखवता येणार नाहीत, हे स्पष्ट दिसते.**

सर्जकतेच्या अभावातून जेव्हा सर्जकतेबाबत शोध, संवाद होतो तेव्हा ' विचार ' हेच साधन उपलब्ध असते. विचार गुंतागुंतीचा असतो. पण सर्जकतेला विचाराचे नियम लागू नाहीत.

--- ००० ---

The more the expenses the lesser the possibility of accepting the challenges of content. Theatre is the only performing art that can express greatest challenges with the least expenses. This is the major capacity of this form. If we fail to see this, theatre also will become mere entertainment without the creative process of facing life. Moreover excessive use of ' effects ' becomes a hindrance if the play is creative in content.

स्थितिशील ( सवयव्यग्र ) मन कामचलाऊ युक्त्या लढवते, तो अज्ञानातला शहाणपणा.

' घर अमुचे आकाश ' या ओळीचे दोन अगदी विरुद्ध अर्थ कसे लागू शकतात हे मी शाळेत असताना सांगितले होते, तेव्हा आमच्या बाई डोळ्यांतून पाणी येईपर्यंत हसल्या होत्या !

बिनशर्त प्रेम एखाद्या विशिष्ट व्यक्तीवर असत नाही. विशिष्ट व्यक्तीवरचे प्रेम हे सशर्तच असते आणि त्याच्याबरोबर द्वेष आणि दुःखही असतातच. मग व्हॅलेंटाईन डे म्हणा, लाल बदाम काढा नाहीतर गुलाबांची उधळण करा. कपडे कुठले घालायचे ते मात्र तुम्ही उत्साहाने ठरवू शकता !

NOTHINGNESS !
( एकाने चर्चेला टाकलेला शब्द. )

Somethingness is conflict.

अंतर्विरोध आणि इतर सगळ्याच समथिंगनेसशी संघर्ष. हाच सगळा साहित्याचा कच्चा माल असतो. कच्चा माल कोणता आहे, यावर साहित्याचे मूल्य ठरते का, हा प्रश्न आहे.

थोडे अधिक स्पष्ट करतो. लेखक स्वतः समथिंग असतो आणि तो, समथिंग असलेला माल हाताळत असतो. लेखकाचे वा त्या मालाचे जात, वर्ण, वर्ग यांबाबतचे वास्तव, दारिद्र्याचे वा आजारपणाचे वास्तव, समाजवाद, मार्क्सवाद, आंबेडकरवाद, गांधीवाद, भांडवलशाहीवाद, हिंदुत्ववाद, मराठीवाद, स्त्रीवाद, वगैरे कोणत्याही समथिंगनेसमुळे साहित्याचे मूल्य आपोआप ठरते का, हा प्रश्न आहे. असे म्हटल्यास, मूल्यमापन-उपपत्तीच्या कशा, किती चिरफळ्या उडतील याची कल्पना करून पाहावी.

बरोबर. एखाद्याला त्याच्या गावी अजूनही नदी पोहून जावे लागते, एखादा मेधा पाटकरांच्या चळवळीशी जोडलेला आहे, एखाद्याने नाटक बसवण्यापूर्वी गावात संडास बांधून दिले, अशा गोष्टींमुळे त्यांच्या कलाकृतींच्या बाबतीत समीक्षकांनी जास्त मार्कांची देवाणघेवाण करणे, हे सांस्कृतिक मूल्ये नाकारणेच आहे. सांस्कृतिक मूल्ये ही माणसाच्या जगण्यात सहानुभूती मूल्यांहून खूपच प्रचंड श्रेयस्कर असतात, याही तथ्याकडे हे दुर्लक्ष करणे आहे.

सहानुभूतीपेक्षा शहाणपणाचा ( wisdom ) आवाका खूप मोठा असतो आणि मौलिकताही प्रचंड असते. आणि हे अर्थातच प्रत्यक्ष त्या कलाकृतीतच असायला हवे. आत्मकेंद्री आणि सामाजिक या बालिश भेदातून कलेची समीक्षा करणे म्हणजे सांस्कृतिक विध्वंसच.

माणसाच्या सगळ्या प्रश्नांचे उगमस्थान आहे त्याचे मन. त्या मनाचे वागण्याचे प्रकार, त्याची रचना, त्याच्या कृतींतून निर्माण होणारी गुंतागुंत या सगळ्याचा आवाका  घेणाऱ्या कलाकृतींना असामाजिक म्हणून झिडकारायचे आणि प्रश्नांची विभागणी करून त्यातल्या एकाच भागाला महत्त्व द्यायचे, हा अत्यंत कोता दृष्टिकोण आहे.

--- ००० ---

<u>प्रायोगिक नाटक.</u>

१.आशय सवयीतला नसतो.

२.त्यामुळे सादरीकरण सवयीतले नसते.

३.आशयाच्या वेगळेपणामुळे तांत्रिक परिणाम ( प्रकाश, संगीत, इ. ) कमीत कमी ठेवावे लागतात. अडथळा होऊ नये हा हेतू. ( अशा नाटकांना प्रेक्षक कमी असल्याने खर्चही कमीत कमी ठेवावा लागतो. ) आशयाला महत्त्व असल्याने प्रेक्षकांच्या कल्पनाशक्तीकडूनही अधिक अपेक्षा ठेवणे इष्ट.

४.इतर म्हणजे व्यावसायिक नाटकांच्या बाबतीत करमणूक हाच हेतू असतो आणि स्वतःच्या मानसिक कमकुवतपणासाठी प्रेक्षक पैसे देऊन लुटून घ्यायला तयार असतो, पर्यायाने त्याला तांत्रिक परिणामांची समृद्धी हवीच असते. इथे अडथळा येण्याचा प्रश्न नसतो. प्रेक्षकांच्या कल्पनाशक्तीला त्रास नको असतो.

५.कमीत कमी खर्चात व कमीत कमी अवडंबरात आशयाची अमर्याद आव्हाने घेऊ शकणारा नाटक हा ‘ सादर ‘ होणारा असा कलाप्रकार आहे. त्याचे हे वैशिष्ट्य प्रायोगिक नाटकाच्या बाबतीतच अर्थपूर्ण ठरते. या कारणासाठी नाटक आवडणारे ते खरे नाटकवेडे. बाकीचे नुसते करमणूकवेडे.

६.ज्याचेत्याचे कंडिशनिंग तीच ज्याचीत्याची परंपरा. ‘ देशीवाद ‘ ह्या सोडून. स्वतःच्या कंडिशनिंगबद्दलही जे प्रश्न उभे करते ते खरे प्रायोगिक नाटक.

सिनेमा असो की नाटक असो ‘ धंद्या ‘ बद्दल कमीअधिक बेफिकिरी बाळगून आशयसंपृक्ततेला महत्त्व द्यायचे असेल तर बजेट आटोपशीर ठेवले जाते आणि त्याला कुणी ‘ दरिद्रीपणा ‘ म्हणत नाहीत. स्वयंपाकघरातल्या नळाला खरोखर पाणी येते, हे व्यावसायिक नाटकात एक वेळ ठीक म्हणता येईल पण प्रायोगिक नाटकाला त्याची गरज वाटत नाही. रंगमंचावर धडाडत जाणारी रेल्वे, प्रत्यक्ष विमानतळ, ब्रेबॉर्न स्टेडियम हे प्रायोगिक नाटकात कुणी करत नाही. ‘ सूचकता ‘ हे सर्जक आणि कलात्मक द्रव्य त्यासाठी वापरले जाते. त्यामुळेच फिरता रंगमंच, सरकता रंगमंच यांच्या अभावी प्रायोगिक नाटकाचे काहीच अडत नाही. वर दिलेल्या उदाहरणांना नाट्यचिन्हांचा विशेष दर्जा आलेला नाही. याउलट ‘ घाशीराम कोतवाल ‘ मधल्या कमानीवरचा गणपती हा एक अर्थसंपृक्त नाट्यचिन्ह ठरतो. ( डॉ. राजीव नाईक यांचे ‘ नाटकातली चिन्हं ‘ हे पुस्तक पाहावे. ) प्रेक्षक कमी, आवक नाही एवढ्याच कारणांसाठी हा बजेटचा आटोपशीरपणा नसतो तर नेपथ्य, प्रकाश, संगीत यांच्या अनावश्यक श्रीमंतीमुळे नाटकाच्या आशयावरून लक्ष विचलित होऊ नये, हाही हेतू असतो. मला विमानतळच दाखवा, नाहीतर मी पुढचे नाटक पाहूच शकणार नाही असा बालहट्ट प्रायोगिक नाटकापुढे कुणी धरत नाही. व्यावसायिक नाटकापुढे तो धरला जाऊ शकतो. अशा प्रकारे, गुंतवणूक तुलनेने खूपच कमी लागत असल्याने आशयाच्या बाबतीतली आव्हाने घेणे इथे अधिक शक्य असते आणि हे नाटक या फॉर्मचे बलस्थान आहे. आशयाची सुरुवात सांहिता करते हे कुणी अमान्य करत नाही. तसेच, सर्व टीमच्या चिंतनशीलतेच्या एकत्र येण्यानेच नाटक हा इतका समृद्ध कलाप्रकार ठरतो हेही कुणी अमान्य करत नाही. उत्तम प्रयोग होत असलेल्या नाटकाचेही, ( पैशाअभावी ) किमान महत्त्वाच्या शहरांमध्येही प्रयोग सादर होऊ शकत नाहीत, हे जमिनीवरचे वास्तव आहे. हवेत इमले बांधायचा ‘ धंदा ‘ हे प्रायोगिक नाटकाचे क्षेत्र नव्हे.

काही दिवसांपूर्वी एफबीवरच नाटकाचा सिनेमा होऊ नये अशा अर्थाचे नासिरुद्दिन शहांचे एक वाक्य चर्चेला होते. त्याचाच संबंध जोडून ही कॉमेंट पाहता येते. प्रायोगिक नाटकाच्या क्षेत्रात अमुकच एक अशी नाटकाची मागणी आहे असे काही नसते. त्यामुळे, ‘ अवध्य ‘ हे नाटक अमुकच एका पद्धतीने होऊ शकते असे काही नसते. प्रत्येक दिग्दर्शकागणिक आणि टीमगणिक कल्पनाशक्तीचे असंख्य धुमारे शक्य असतात. लाख्यांसह मी एनएसडी महोत्सवात दीडशे दिवे वापरलेले एक भंगार नाटक पाहिले होते. तिकडे आता ही फॅशन रुळत आहे असे कळले. इथे, लाख्यांनीच बसवलेल्या माझ्या ‘ समतोल ‘ या नाटकाचे उदाहरण देतो. हे एक मध्यमवर्गीय घर आहे हे सुचवण्यासाठी त्यांनी अशा घरात असणाऱ्या वस्तूंची ( फ्रिझ, पंखा, स्टीलचे कपाट, मिक्सर, इ. ) एक चित्रचौकट समोर लावली होती, बाकी फारसे काहीच नेपथ्य नव्हते. वस्तुतः हे नुसते पुरेसेच नव्हे तर अत्यंत कल्पक नेपथ्य होते. हे नाटक स्पर्धेत होते. नाटकाची नसली तरी एका कल्पकताहीन परीक्षकाची अशी मागणी होती की एक पात्र जर खिडकीशी वाट पाहणार आहे तर प्रत्यक्ष खिडकी दाखवायलाच हवी. या कारणाने नाटक त्या स्पर्धेतून उखडले गेले ! नाटकाची मागणी आहे म्हणून मर्यादित प्रेक्षकसंख्येच्या पाच प्रयोगांसाठी कुणी तीन लाखांचा सेट करत नाही हे एक आणि एखादा पेन्सिल स्पॉट वगैरे ठीक असला तरी असली फार जादूगिरी नाटकाला मारकच ठरेल यात शंका नाही. चांगल्या गायकाचे शास्त्रीय गाणे चालु असताना तबलजीच जर सारख्या त्याच्या करामती दाखवायला लागला तर तो अडथळाच होणार. दिग्दर्शकाला, तंत्रज्ञांना काही माहितीच नसावी आणि ते अडाणी असावे, असा इथे पुरस्कार चाललेला नाही, हे लक्षात घ्यावे. नाटक हे दृश्य, श्राव्य वगैरे सर्वच असलेले माध्यम आहे हे समजूनच ( आणि समजूनही ) आणि ही समज कल्पकतेने वापरूनच दुब्यांसारखे दिग्दर्शक काम करत असतात. नेपथ्याला टाळी हे नेपथ्याचे अपयश आहे असे मानणारे ग्रेट नेपथ्यकार

आपल्याकडे होऊन गेलेले आहेत. व्यावसायिक नाटकात ही मान्यता उलट असू शकते. थोडक्यात, नाटक या फॉर्मचे बलस्थानच झाकोळून टाकले गेले तर काही चांगले घडण्याच्या इथे असणाऱ्या शक्यता नष्ट होत जातील, हे दुर्लक्षू नये.

" त्या बंडखोरीमागे काही तात्विक विचार असावा लागतो व हा विचार नेहमीच जगण्याबद्दलच्या मूलभूत प्रश्नांमधून जन्मलेला असतो. आपल्या नाटकामधली बंडखोरी जीवनविषयक तत्त्वचिंतनातून निर्माण झालेली आहे असे दिसत नाही. " हे एलकुंचवारांचे वाक्य या चर्चेत इथे पुन्हा प्रस्तुत ठरते.

<u>जत्रेतलं जायंट व्हील.</u>

हिमांशू स्मार्त लिखित आणि प्रवीण भोळे दिग्दर्शित हे नाटक काल दि. ०३-०३-११ रोजी पुण्यात सुदर्शनला पाहिले.
" प्रत्येक प्रेक्षकाला दिसलेले आणि जाणवलेले नाटक वेगळे असेल कारण प्रत्येकाचा दृष्टिकोन मुळात वेगवेगळा असतो "
या उत्तरआधुनिक धारणेतून सादर केलेले हे नाटक. आजची झगमगती स्वप्ने, मॉलसंस्कृती आणि जगण्यातले अनेक विरोधाभास
हा आशय व्यक्त करणारे हे नाटक. ' रंगीबेरंगी, चमत्कारांनी भरलेलं, स्वीट आणि हॉटही ' असे हे ' द व्होल न्यू वर्ल्ड ' आहे, असे परिचय-पत्रकात म्हटले आहे. हा आशय नाटकातून व्यक्त होतोच. उत्तरआधुनिक धारणांमध्ये, एक कौशल्यपूर्ण मांडणी एवढेच दाखवायचे असते. याला ' उथळ, बाळबोध, प्रगल्भ, सखोल ' वगैरे म्हणणाऱ्याला हे ' बावळट ' म्हणणार. मूल्यमापन शक्यही नसते आणि कुणी केलेच तर ते निरर्थक असते, अशी ही मान्यता असते. त्यामुळे, ' अनुभव देण्याचा प्रयत्न करतो ' एवढाच, म्हटला तर, हेतू असतो. मला यात जरा घोळ जाणवला. हिमांशू स्मार्त हा अलिकडच्या काळातला एक चांगला लेखक आहे. ' रिसायकल करता येतील अशी स्वतःची रिफ्लेक्शन्स ' असले अचाट सुचणारा हा लेखक आहे. मधेमधे त्याची चिंतनशीलताही जाणवते. तरीही, या दृष्टीने पाहता, या नाटकात लेखक कमी आणि पर्फॉर्मन्स जास्त असेच अनुभवाला आले. हिमांशूचे काही संवाद अशा थिएट्रिकल पर्फॉर्मन्सशिवाय पोचलेही नसते. पण, उत्तर-आधुनिक व्हायला तुम्हाला कोण ' भरीला पाडतेय ' ? की काही लेखकांमधला हा आंतरविरोध असू शकेल ? हे नाटक पाहताना माझ्याबरोबर प्रा. विजय कारेकर होते. त्यांनाही असाच प्रश्न पडला होता की हे अनुभव देतायत की त्यावर टीका, उपरोध व्यक्त करतायत ? थिअरी नको म्हणत उत्तरआधुनिक हीच थिअरी करून स्वीकारणे असे तर हे होत नाहीय ना ? मला असे वाटले की याच आंतरविरोधाचे आकलन व्यक्त करणारे नाटक हिमांशूने लिहावे !
बाकी या गोंधळासहही नाटक चांगले आहे, प्रयोग उत्तम होतो.

अमुक माणूस लिहू शकतो, तेंव्हा त्याने म्हशीप्रमाणे नियमित दुध किंवा निदान शेण तरी दिलेच पाहिजे असं आजचं भाबडं साहित्यशास्त्र सांगतं....!
– पद्मश्री पुरस्कार विजेते डॊ. भालचंद्र नेमाडे – या दिलेल्या वाक्यावर –
लेखकाने किती आणि कसे लिहावे याबाबतच्या इतरांच्या अपेक्षांची कुठलाही चांगला लेखक दखल घेत नाही ( ' लाडके व्यक्तिमत्व ' होण्याची महत्त्वाकांक्षा नसेल तर ). पण त्याची निर्मितीप्रक्रिया म्हणजे तरी काय ? जगताना येणाऱ्या त्याच्या नुसत्या चांगल्या आणि वाईट ( दूध आणि शेण ) प्रतिक्रिया ? हे इथे दिले गेलेले वाक्य जर नेमाड्यांचे असेल तर एक प्रश्न पडतोच – हा इतका बुद्धिमान, समीक्षक वगैरे असलेला लेखक, दुसऱ्यांबद्दल जसे भरपूर शेरे देतो तसे स्वतःच्या निर्मितिप्रक्रियेबद्दल फारसे का बोलत नाही ?
--- ००० ---

असे एकेक मांडण्यापेक्षा माणसाच्या डोक्यातच काही फॉल्ट आहे का, हेच पाहावे का ?

-- मेंदूव्यतिरिक्त परिसरातून मेंदूत फॉल्ट तयार होतो !!

विजेची गळती म्हणा की चोरी म्हणा, ती करणाऱ्याची आणि त्याला पकडण्याची जबाबदारी असूनही त्याला न पकडणाऱ्याची अशी दोघांचीही ती गलती ( चूक ) आहे, हे तर सगळेच म्हणतील. प्रश्न कारणमीमांसेच्या बाबतीत येईल. अमिताभ बच्चन मोठा झाल्यावर ' वाईट ' का झाला तर त्याचे बालपण असे असे वाईट गेले होते हे दाखवायचे आणि अमजदखानचे बालपण वगैरे पटावरच न घेता त्याला प्युअर दुष्ट म्हणून प्रेझेंट करायचे, असा आयुष्याचा सोपा हिंदी पिक्चर करणे, हा आपल्या लहरीचा भाग ठरेल. तुमची लहर वेगळी आणि माझी वेगळी असे झाले की विषयच संपला ! न जाणो, परिसरातून आपल्या मर्जीने कारणे शोधण्यातून सगळ्यांनाच जबाबदाऱ्या टाळता येतील किंवा सगळेच समर्थनीय ठरेल ! किंवा मग, मी म्हणेन ते सत्य आणि मी देईन तो न्याय, असे तरी होईल !

( फॉल्ट ) तुमच्या किंवा माझ्या मेंदूत नुसता नव्हे, माणसाच्या मेंदूत ! कुठल्याही विचारसरणीचे भक्त असलेले लोक आपण सोडून दुसऱ्या सगळ्यांच्या मेंदूत फॉल्ट आहे, असे समजत राहतात. हाही त्या कॉमन मेंदूफॉल्टचाच परिणाम असतो.

कोणती तरी विचारसरणी, वाद, धर्म, स्वभाव अशा ISOLATE करणाऱ्या कृतीशिवाय काहीच शक्य नाही ही सवयीची खात्री आपल्यालाच संशयास्पद होऊ लागली की उपरोधिक होणे ही प्रतिक्रिया येऊ शकते. कुठल्याही फलाटावर बसून एसटीची वाट पाहण्याचा हा प्रश्न नाही. प्रथम उपरोध, तुच्छता, वैताग, उद्वेग, असल्यास, शांत होऊ दिले पाहिजेत. इथून पुढे एसटी, भगवद्गीता, अशा कुठल्याही वाहनाची वाट पाहणे म्हणजे WAITING FOR GODOT. आणि निराशा म्हणजे अलगताच. अलगता हाच तर फॉल्ट नसेल ?

स्वतःतल्या अलगतेच्या प्रश्नाला सामोरे जाण्याचे नाकारूनच जगायचे हे जोपर्यंत आपले पक्के ठरलेले आहे तोपर्यंत आपण सगळे कुंपणावर बसूनच ' बरे वाटणारे ' बोलणार ! अमुक असे जगणे असूच शकत नाही हे सांगण्यासाठी तुम्ही जे. कृष्णमूर्तींचे म्हणणे दिलेले दिसते. सध्या आहे ते ठीक आहे, याच पद्धतीतून काही चांगले घडेल, आणि एकूणात माणसाचे भले होत चाललेले आहे, यावरचा विश्वास उडालेल्यांचा प्रश्न आहे. मी जेव्हा जे. कृष्णमूर्तींच्या शब्दांच्या संपर्कात असतो तेव्हा तुम्ही म्हणता असे निष्कर्ष न बाळगता असतो. एकमेकांच्या अलगतेबद्दल मूल्यमापन, वाद-प्रतिवाद या तर जनरलच सवयी आहेत. तशा अंगाने जाऊन काही उपयोग होणार नाही. समजा मी किंवा एक क्ष हा अत्यंत क्षुद्र माणूस आहे असे ठरले तरी कुठल्याही चर्चेला त्याचा उपयोग काय ? दुसऱ्यांबद्दलच्या विश्लेषणापेक्षा स्वतःच्या प्रश्नांचे उगम सापडतात का, हे पाहणे, हेच महत्त्वाचे.

<u>तुकारामाची कविता.</u>

तुकारामाची कविता तिच्यातल्या आशयामुळे, माणसाच्या जगण्याबाबत तिच्यातून व्यक्त होणाऱ्या आकलनामुळे ‘ ग्रेट ‘ आहे असे समजणारे आणि ‘ समजणारे ‘ ही खूप आहेत. पण, हे असे जगणे शक्यच नाही, हे सगळे ‘ अध्यात्मिक ‘ आहे, हे माणसाला कुठेही

नेऊ शकत नाही, असे नाराजीचे ‘ विरोधी ‘ निष्कर्ष मनात बाळगूनही तुकाराम वाचणारे काही आहेत. विशेष म्हणजे, ‘ तुकाराम हा एक ग्रेट कवी आहे ‘ याबद्दल या सगळ्यांचे एकमत असते ! हे काय गौडबंगाल असते ? कवितेचा आशय वगळून कविता ग्रेट ठरण्याचे चमत्कार जगात इतरत्र कुठे घडले आहेत का, घडतात का, याची माहिती, कुणाकडे असल्यास, द्यावी. तसे नसेल तर मराठीकडून ही माणसाच्या जागतिक संस्कृतीला कॉंट्रिब्यूशन का म्हणू नये ? की हा एक ‘ भित्रट दांभिकपणा ‘ आहे अशी याची बोळवण होण्याची शक्यता लक्षात घेऊन गप्पच बसावे ?

कोणत्याही कवीच्या ग्रेटनेसबद्दल आपण बोलतो तेव्हा त्याने लिहिलेली अत्युच्च दर्जाची, कसदार, आशयघन कविताच आपल्या समोर असते. तुकारामाच्या बाबतीत अशी कविता ' अध्यात्मिक ' आहे. अध्यात्मिक म्हणजे जणू खोटे, काल्पनिक असे भासवले जाते. परंतु, तेच खरे जगण्यातले मूलभूत प्रश्न असतात. धर्म, तत्त्वज्ञान या गोष्टी फावल्या वेळच्या गप्पा या स्वरूपात निर्माण होत नाहीत. हे प्रश्न पूर्ण माणसाच्या जगण्यालाच प्रस्तुत असल्याने त्यांचे आकलन व्यक्त करणारी कलाकृती महान ठरते. हे प्रश्न फेटाळून जगण्याची कोणतीही पद्धत जगण्याची नासाडीच करते, हे दिसते. त्यामुळे, मटेरियल जरी स्थानिक असले तरी ती कविता पूर्ण मानवजातीलाच महत्त्वाची ठरते. कवितेच्या या आशयाकडे बुद्धिप्रामाण्यवादी, परिवर्तनवादी लक्ष देतात का हा प्रश्न आहे. आणि याकडे दुर्लक्ष करून तुकाराम ' ग्रेट ' म्हणजे काय ?

<u>**दुय्यम आणि तिय्यम.**</u>

टी. एस. एलियट यांना १९४८ चा आणि सॅम्युएल बेकेट यांना १९६९ चा साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळाला. समीक्षकाने कोणत्याही पुरस्काराच्या दबावाखाली मूल्यमापन करू नये हे बरोबरच आहे ( आणि हे आपल्याकडच्या सर्व पुरस्कारप्राप्त लेखकांच्या बाबतीतही लागू आहे ). नेमाड्यांनी या दोन नोबेल लेखकांना ‘ दुय्यम दर्जाचे ‘ म्हटले आहे. ( ‘ टीकास्वयंवर ‘ पृष्ठ ११५ ). मानपत्र देताना जसे निकष दिले जातात तसेच अवमानपत्र देतानाही दिले पाहिजेत, यात दुमत होऊ नये असे वाटते. मग मराठीतले अलिकडचे अव्वल दर्जाचे लेखक कोण, तर अर्थातच साने गुरुजी, भाऊ पाध्ये आणि अर्थातच नेमाडे. ( पु. ल. आणि वपु का नाहीत ? ) असेही मूल्यमापन असू शकते, पण ते सखोल, सकारण असावे लागेल. तसे होत नसेल तर याला ‘ लहर ‘ म्हणावे लागेल. किंवा मग कुणाचेही काहीही मत असू शकते, असा हा एक पोस्टमॉडर्निझम म्हणावा लागेल. पण पोस्टमॉडर्निझममध्ये मूल्यमापनाची चिंता करणे आणि त्याबाबत तावातावाने ( कागदाच्याही ! ) बोलणे बसत नाही. मग याला ‘ बेसलेस प्रि-पोस्टमॉडर्निझम ‘ म्हणावे का ? की ‘ तिय्यम दर्जाची समीक्षा ‘ म्हणावे ?

नेमाडे एक लेखक आणि नेमाडे एक समीक्षक यांच्या आकलन-प्रक्रियांत खूप तफावत आहे, असे तुमचे म्हणणे दिसते.

. तुमचे वाक्य आले ध्यानात. सामान्यतः लेखक, नाट्यदिग्दर्शक, चित्रपट-दिग्दर्शक जेव्हा समीक्षक वा थिअरिस्ट होतात तेव्हा ते स्वतःच्या आकलनातल्या सर्जक-प्रक्रियेबद्दल बोलत असतात. याला नेमाडे अपवाद आहेत, हेविवाद्य वाटते. असा प्रचंड split अपेक्षित नाही. अशा दुभंग पद्धतीने कुणी काम केल्याचे मला माहिती नाही.

प्रणव, माझेही तुझ्यासारखेच मत आहे. सराव, अभ्यास, विद्वत्ता आणि मटेरियलचा साठा हे चांगली किंवा अव्वल कलाकृती निर्माण व्हायला पुरेसे नाहीत, याचे हे उदाहरण. त्यांची जी व्यक्तिगत ' संकुचितता ' आणि गोंधळ ( confusion ) समीक्षाटाईप लेखनात दिसतात तेच त्यांच्या

कलाकृतींतही दिसतात. ' फोर क्वार्टेटस ' आणि ' वेटिंग फोर गोदो ' या कलाकृतींना ते दुय्यम म्हणू शकतात, यात आकलनातून येणारा धाडसीपणा नसून गोंधळातून आणि कमकुवतपणातून येणारा आक्रमकपणा आहे.

--- ००० ---

ज्या डावेपणाची महाराष्ट्रीयांनी राजकीय क्षेत्रातून हकालपट्टी केली तोच डावेपणा महाराष्ट्रीयांच्या सांस्कृतिक क्षेत्रात फोफावावा हे महाराष्ट्रीयांच्या दुभंग व्यक्तिमत्वाचे लक्षण आहे.

--- ००० ---

<u>देशी आणि संकुचित .</u>

‘ टीकास्वयंवर ‘ च्या पृष्ठ ९६ वर नेमाडे म्हणतात, “ मराठी समाजात सुदैवाने विचारांचा एकसुरी एकजिनसीपणा नाही. “ तेच नेमाडे पृष्ठ १२० वर म्हणतात “ समाजाची सामूहिक चिंतनशक्ती आणि भावशक्ती देशीपणात प्रकट होते. “ – असे हे एकत्र कळायला जरा अवघड जाते ! (२ ) पृष्ठ ३४४ वर लेखकांची चांगली वैशिष्ट्ये सांगताना ते “ ... महानगरातील वर्गकलहापासून मुक्त भाऊ पाध्ये ... पुण्याच्या ब्राम्हणी संस्कृतीपासून मुक्त श्याम मनोहर “ असे म्हणतात. आपल्या समाजाची संकुचितता ( आणि स्वतःची ? ) लक्षात येणे चांगले, असे त्यांनी तिथेच आधी म्हटलेलेच आहे. म्हणजे वर्गकलह आणि ब्राम्हणी संकृती हे ‘ संकुचित ‘ असणार हे उघडच आहे. ब्राम्हणी संस्कृतीबद्दल समजा एकमत होईल, पण वर्गकलह ? तोही ? बरे, मराठा संस्कृती ? त्याचे काय ? चांगला लेखक होण्यासाठी कोणकोणत्या संकुचित गोष्टींपासून मुक्त असायला हवे, त्यांची यादीच करता येईल काय ? पण, सावधान ! ही यादी वाढत गेली तर एकूण देशीपणाच धोक्यात येईल का, ते आधी तपासून घ्या ! संकुचितपणाचे असे तुकडे तुकडे किती सांगत बसणार ? त्यापेक्षा, संकुचितपणा म्हणजे काय, असे थोडे मतभेदातीतही बघायला नको ? न जाणो यासाठी तत्त्वज्ञानाच्या, अध्यात्माच्या क्षेत्राकडे जावे लागेल ! टी. एस. एलियट म्हणालाच होता की एखादे लेखन ‘ साहित्य ‘ आहे की नाही हे तुम्ही साहित्याचे दंडक वापरून सांगू शकाल, पण ते लेखन मौल्यवान आहे की नाही हे नुसते साहित्याचे दंडक वापरून सांगता येणार नाही !

संदर्भच सापडला. टी.एस. एलियट त्याच्या Religion and Literature या लेखात म्हणतो, " The ' greatness ' of literature cannot be determined solely by literary standards; though we must remember that whether it is literature or not can be determined only by literary standards. "

--- ००० ---

People who learn some accurate detail of another person's life at once deduce consequences which are not accurate, and see in the newly discovered fact an explanation of things that have no connection with it whatsoever.

--- MARCEL PROUST .

असे जगण्यातल्या ॲब्सर्डिटीचे भान येणे हे पूर्ण मानवाच्याच जगण्याला श्रेयस्कर आहे, हे जाणवते. हे भान येण्याने परिवर्तनवाल्यांचे परिश्रम वाचतील, असे नाही वाटत ? की त्यांना परिश्रमच हवे आहेत आणि ते कमी होतील असे काही नकोच आहे ?

ज्यांना तसे योग्य वाटते त्यांनी तसे करण्याबाबत काही म्हणणेच नाही. सखोल, चिंतनात्मक कलाकृतींना विरोध करण्यापेक्षा त्याही माणसाच्या ' श्रेयस ' चेच कार्य करत असतात, हे जाणणे आवश्यक आहे, हा मुद्दा आहे. आपण मात्र शहाणे वेडे आणि बाकीचे नुसतेच वेडे, असे समजणे हिताचे वाटत नाही, इतकेच.

‘ मी माझ्यासाठी मिळवायचे ' हे पूर्ण मानवजातीचे मन वापरण्याचे पायाभूत तत्त्व आहे. यात काहीही क्रांती न घडता सगळे काही नीट होऊ शकेल, अन्यायी परिस्थिती नष्ट होईल, असे मानणारे ' सम्यक ' क्रांतिकारक यशस्वी होवोत, हीच शुभेच्छा !

ह्या ( म्हणजे आपल्या ) सांस्कृतिक पार्श्वभूमीवर ' माझं काम जगात परिवर्तन करणं नाही तर माझं काम जीवनाचं यथास्थित चित्रण करणं हेच आहे ' असं सांगणाऱ्या सारामागोवर मराठी साहित्याच्या हौशी आणि लोकप्रिय रंगमंचावर प्रतिगामी म्हणून दगडफेक होऊ शकते. -- विश्राम गुप्ते, ' खेळ ', दिवाळी २०१०.

पुरोगामी लेखक विरुद्ध प्रतिगामी लेखक अशी ढोबळ मांडणी करणाऱ्या आणि ती खरोखरच अस्तित्वात असते असं मानणाऱ्या सुबोध पण वावदूक मराठी साहित्यिक पर्यावरणात ' त्यांचा ' ( म्हणजे इथला नसलेला ) लेखक वेडाच भासतो.  --  विश्राम गुप्ते, ' खेळ ', दिवाळी २०१०.

ज्ञानदा, गुप्ते ' प्रतिगामी ' ची व्याख्या कशी करतील ते मला माहीत नाही. त्यांनाच विचारावे लागेल. परंतु, साहित्यात, कलेत, जे साहित्यात वा साहित्याबाहेर डावे, परिवर्तनवादी नाहीत त्यांना निकालात काढायची एक पद्धत दिसते,ती लक्षात घेऊन त्यांनी वरील विधान केले आहे असे मला वाटते. या दृष्टीने आपल्याकडे सारामागो, पिरांदेल्लो, बेकेट, आयनेस्को, गाओ झिंगझिआन हे सगळे प्रतिगामी ठरतील असे ते सुचवताहेत. मला हे पटते. कुठल्या का असेना, डाव्या विचारसरणीच्या प्रभावाखाली कलानिर्मिती न करणे म्हणजे प्रतिगामी, असा रूढ अर्थ इथे अभिप्रेत दिसतो. वस्तुतः, जगण्याचा असा विचारसरणीनिरपेक्ष आवाका घेणाऱ्या कलाकृती कधीच विषमतेच्या, शोषणाच्या समर्थनार्थ अस्तित्वात येत नाहीत. परंतु, प्रत्येक कृती ही राजकीय कृतीच असते आणि तीत तुमची ' भूमिका ' अंतर्भूत असते, असे या पुरोगाम्यांचे ठरलेले असते. ' भूमिका ' या स्थितिशील शब्दाची प्रचंड आवड असणाऱ्यांना कुठलीही ग्रेट कलाकृती कळूच शकणार नाही, याबद्दल मला शंकाच नाही. फुटीरता, अलगता, विदीर्णता ही माणसाचे मन कृतिशील असण्याची वैशिष्ट्येच आहेत. ती मान्य करून, गृहीत धरून, फक्त त्याचे दुष्परिणाम टाळता यावेत असे आपल्याला वाटते. जगभरच्या सगळ्याच माणसांच्या जगण्याची हा रोग या ना त्या प्रकारे वाट लावतो आहे. ' माणसा माणूस हो ' वगैरे वाक्यांचा काहीही उपयोग होताना दिसत नाही.

--- ००० ---

आजच्या ' सकाळ ' च्या ' सप्तरंग ' पुरवणीतला सचिन कुंडलकर यांचा ' सामाजिक ' हा लेख जरूर वाचावा. आपले कलाक्षेत्र खुजे करण्याचे काम फक्त हिंदुत्ववादी किंवा इतिहासप्रेमी संघटनाच करत नसून तथाकथित बांधिलकीवाले -- भूमिकावालेही करत आहेत, हे आपण लक्षात घ्यायला हवे.

ओंकार, उलट, कलाकृती ही कलावंताच्या मतांनी, श्रद्धांनी मर्यादित न होणे आणि या अर्थाने ती दिशाहीन असणेच महत्त्वाचे असते, हे अनेक ( जगन्मान्य ) ग्रेट कलाकृतींवरून दिसते. पण बांधिलकीवाल्यांचा याला नकारच असतो. झेंडा, बंदुका वगैरे प्रॉपर्टी ही बांधिलकीवाल्यांना लागते. त्याशिवाय त्यांचे नाटक चालुच शकत नाही.

आपल्याला जे कळत नाही वा महत्त्वाचे वाटत नाही ते अस्तित्वातच असता कामा नये, असे वातावरण काही कलावंतांना जाणवावे अशी परिस्थिती आहेच. त्याला ही प्रतिक्रिया आहे. अशा प्रतिक्रियांची संख्या त्या दबावाच्या मानाने खूप कमी दिसते. त्या लेखातल्या भाषेबाबतचे, मांडणीबाबतचे आक्षेप जरूर विचारात घेतले पाहिजेत, पण बांधिलकीच्या सक्तीचा मुद्दा दुर्लक्षिला जाऊ नये. ' कुठे आहे सक्ती ? प्रत्येक कलावंत स्वतंत्र तर आहे ' अशा ढोबळपणेही याकडे पाहिले जाऊ नये. वस्तुस्थिती अडथळे निर्माण करणारी असल्याशिवाय उगीचच अशा प्रतिक्रिया येणार नाहीत.

व्यक्तीला व्यक्तिकेंद्री ( ‘ आत्मकेंद्री ‘ अधिक वाईट असेल तर ते ) व्हायला तथाकथित समाज नुसते प्रोत्साहनच देत नाही तर सक्ती करतो. राष्ट्र, धर्म, भाषा, विचारसरणी वगैरे गोष्टींशी एकरूप होणे, त्यांच्या अस्मिता बाळगणे, ही मनाची रचना घडण्यामध्ये त्या तथाकथित समाजाची अहम भूमिका असते. त्यातून मग अनेक प्रश्न निर्माण होतात. पण मूळ रोगाकडे दुर्लक्ष करायचे असल्यामुळे असे सुचते की आता प्रश्नांची व्यक्तिगत आणि सामाजिक अशी विभागणी करू ! सर्वांची मने, समाज, परिस्थिती यांच्या एकमेकांवर होणाऱ्या अगणित परिणामांतून, क्रियाप्रतिक्रियांतून एकूण माणसाचे जगणे चालु असते. हे सगळे लक्षात घेतले तर व्यक्तिगत आणि सामाजिक हा भेदच बालिश, निरर्थक ठरतो. अशा आकलनातून जगण्याचा आवाका घेऊ पाहणाऱ्या कलावंतांना जेव्हा कलावादी, आत्मकेंद्री म्हणून नुसते हिणवणेच नाही तर उखडून टाकण्याचे प्रयत्न जाणवू लागतात तेव्हा त्या विषयावर बोलणे सांस्कृतिक अभिसरणासाठी योग्य ठरते. तथाकथित पुरोगामी, सामाजिक कलावंतही ‘ कलाकृती ‘ च निर्माण करतात. त्यासाठीही काही किमान ‘ कलात्मक ‘ कौशल्याची गरज असतेच. वर्तमानपत्री परीक्षणे ( आपण त्यांच्या गुणत्तेच्या अभावामुळे त्यांना नगण्य समजू इच्छितो, पण विशेषतः चित्रपट-नाटक यांना ती खूप झळ पोचवू शकतात ), अभ्यासाला लावली जाणारी पुस्तके, निरनिराळे विभागप्रमुख, भाषणांचे-परिसंवादांचे विषय, पुरस्कार-यंत्रणा अशा अनेक माध्यमांतून असे ब्रेनवॉशिंग चालु असल्याचे जाणवते. कलेच्या क्षेत्रात गेली काही वर्षे काही एका दर्जाचे काम करणाऱ्या पाचपन्नास कलावंतांना हे जाणवत असेल तर आपल्या सांस्कृतिक क्षेत्रातला हा एक गंभीर प्रश्न आहे, हे लक्षात घेणेच हिताचे होईल.

**<u>विचार.</u>**

अमर्याद विश्व काही कुठल्याही विचाराचा पाया असू शकत नाही. विचाराचा पाया मर्यादित, ज्याने त्याने आपल्या सोयीने निवडलेला असतो. पुढे त्या विचाराची एक रचना उभी करण्यासाठी लागणारे तपशीलही सोयीने ‘ निवडलेले ‘ च असतात. जे तथाकथित धर्मवादी असतात तेही विचारच वापरत असतात, त्यांच्याकडेही विचारापलिकडचे ‘ धार्मिक ‘ असे काही नसते. त्यामुळे, एकूणात, विचाराच्या क्षेत्रात ‘ सत्य ‘ असे काही नसते. सगळेच ‘ सोयीचे ‘ आणि अर्धवटच असते. हे एवढे तर प्रत्येकाला विचारानेच कळू शकते. त्यासाठी अत्यंत जडजंबाल तत्त्वज्ञ असायची गरज नसते. असे हे सर्व विचारप्रकार ‘ अर्धवट ‘ च असतात, हे समजणे शक्य असूनही माणूस मतभेदांबद्दल सहिष्णू का राहू शकत नाही ? तो टोळ्या करून दुसऱ्यांना दबवण्याचे प्रयत्न का करत राहतो ? तुच्छता, उपरोध, कुत्सितपणा, छद्मी हसणे, ‘ मलाच सगळे कळते ‘ असा भाव चेहऱ्यावर

आणणे, हे सगळे माणूस का करतो ? आणि या खोटेपणाशिवाय माणसाला जगताच येणार नाही, असे म्हणणे म्हणजे एक अटळ निराशावादच स्वीकारणे नव्हे का ? की खोटेपणातूनच शेवटी ‘ सत्य ‘ जन्माला येणार आहे ?
धन्यवाद सहभागी मित्रांनो ! विनयजी, देवी पावावी म्हणून तिच्यापुढे कोंबडी कापणारा आणि एखादा विचार पावेल म्हणून लाखोंच्या कत्तली करणारा या दोघांच्याही ' वैश्विक सत्य ' अंधश्रद्धेच्या ' शास्त्रीय ' नियतीवादाला जे निष्कर्ष मानून जगू इच्छितात त्यांचा प्रश्नच नाही. कळत नकळत हेच वैश्विक सत्य मानल्यामुळेच तर सगळी वाट लागत चाललेली आहे. जे याबद्दल असमाधानी असतील, प्रश्न विचारतील तेच वेगळे काही शक्य आहे का याचा शोध घेतील. अन्यथा ' मूल्य ', ' सर्जकता ' या शब्दांची माणसाच्या जगण्यातून हकालपट्टी झालीच म्हणून समजा. ' झाली तर झाली ! धिस ईज लाईफ ! ' -- हे सगळेच म्हणतील असे नाही.

समोरचे असमाधानकारक आहे हे विचाराने कळल्यामुळेच बुद्ध शोधाला प्रवृत्त होतो. ज्ञानेश्वर, तुकाराम, विवेकानंद हे विचाराच्या मर्यादांना बळी न पडता ' वेगळे ' आकलन कुणालाही शक्य आहे असे सांगतात. कोणतीही ऑथॉरिटी न लक्षात घेता आधी ' आहे ते ' समजून घ्यावे असे मला वाटते. मी ' धार्मिक ' असा शब्द न वापरता ' धर्मवादी ' हा शब्द हेतूपूर्वक वापरलेला आहे. आपल्याला न समजलेल्या गोष्टींचे आधार न घेता आपण कुठे पोचतो, हे पाहण्याचा हा प्रयत्न आहे. आपण जे आहोत तिथून सुरुवात व्हावी, असा हा प्रश्न आहे.

--- ००० ---

--- चं. प्र. देशपांडे, ३, स्नेहदीप, चिंतामणीनगर, सहकारनगर नं. २, पुणे – ४११००९.
फोन – ९३७१००५७७३, ईमेल – champrade@gmail.com वेबसाईट -- www.champralekhan.com

# एकटेपणाचा शौक

--- चं. प्र. देशपांडे.

**विदीर्णता आणि एकात्मता.**

उत्क्रांतीच्या प्रक्रियेतली मेंदूची अवस्था, भाषा, कुटुंब, हवामान, आहार, अनुभव वगैरेंतून होणारे संस्कार अशा सर्व गोष्टींनी माणसाची विचारक्रिया मर्यादित असते. पर्यायाने ती अलगता निर्माण करणारी असते आणि प्रत्येक नात्यात संघर्षमयताही तयार करणारी असते. कुटुंब, भाषा, धर्म, देश यांच्या अस्मिता आणि त्यांच्या अग्रक्रमांचे गोंधळ हे तर जगण्याचे तुकडे करतातच शिवाय नीती, न्याय, समता, स्वातंत्र्य अशी वेगवेगळी मूल्ये मानल्यामुळे त्यांच्यातही निवड करायचे प्रसंग येतात आणि मनाच्या चिरफळ्या उडतात. असंख्य इच्छा, महत्त्वाकांक्षा, हाव, वर्चस्वाची इच्छा, सूड घेण्याची इच्छा यांनीही मन विदीर्ण होते. हिंसेचा त्रास होतो, तिचा त्याग केला पाहिजे हे पटते आणि तरीही हिंसेने वागावेच लागते किंवा वागलेच जाते, न्यायाने वागले पाहिजे हे पटते पण आपल्या वागण्यातून अन्याय होतोच, विषमता वाईट हे पटत असूनही प्रत्येक संबंधात विषमताच अस्तित्वात येते, आपले आणि दुसऱ्याचेही स्वातंत्र्य टिकवता येत नाही, वगैरे, अशा असंख्य प्रकारांनी जगणे विदीर्ण होत राहते. अटळपणे मर्यादित असणारी विचारक्रिया हेच या विदीर्णतेचे कारण असते. या विचारक्रियेत सदोदित अंतर्भूत असलेल्या हेतूपूर्वकतेमुळे अशा मूर्ख जगण्यातून माणसाची सुटका होऊ शकत नाही.

भाषिक वा धार्मिक अस्मिता, देशाभिमान, कोणत्याही विचारसरणीशी असणारी निष्ठा, सामाजिक बांधिलकीचे व परिवर्तनाचे महत्त्व मूलभूत वाटणे, अशा मानसिक अवस्थांतून निर्माण होणाऱ्या कलाकृती या विचारक्रियेच्या वरील वैशिष्ट्यांनी मर्यादित असतात. त्यामुळे त्यांत कोणतीही मूल्यात्मकता असू शकत नाही. अशा कलाकृती मौल्यवान नसतात हा एक भाग झाला; अशा तऱ्हेच्या अपेक्षांनी कलेकडे पाहणाऱ्यांना मौल्यवान असणाऱ्या कलाकृती समजूही शकत नाहीत हा याचा दुसरा भाग आहे. मौल्यवान कलाकृती म्हणजे अमुकच हेतूने प्रेरित नसलेल्या, या अर्थाने दिशाहीन असणाऱ्या, समग्रावधानी कलाकृती. आपण कोणत्याही परिवर्तनासाठी लिहीत नाही असे म्हणणारे बरेच जगन्मान्य लेखक आपल्या समोर आहेत, हे इथे लक्षात घ्यावे. अशा कलाकृतींच्या संपर्कात आल्यावर निर्माण होणारे समग्रावधान हे ‘ वैचारिक ‘ नसते, म्हणूनच मौल्यवान असते. इथे लेखक कसलाही निवाडा करत नाही, बरोबर-चूक सांगत नाही, कुणाची हेटाळणी करणे वा कुणाची भलावण करणे हे करत नाही, तर असंख्य कारण-परिणामांच्या अनाकलनीय परिस्थितीत होत असलेल्या माणसाच्या जगण्याचे तो समग्र भान घेतो-देतो. हे भान म्हणजेही एक विचारच असतो, असे समजणारे त्या कलाकृतीच्या संपर्कात आलेलेच नसतात कारण स्वतःचे घट्ट व्यक्तिमत्व बाजूला ठेवल्याशिवाय , पूर्वग्रह सोडल्याशिवाय तुम्ही अशा ग्रेट, ‘ मौल्यवान ‘ कलाकृतींच्या संपर्कात येऊच शकत नाही, हे त्यांना समजत नाही. ते एक वेळ मूल्याची शक्यताच नाकारायला तयार होतील पण विचारबद्धतेचा हेका सोडणार नाहीत. मौल्यवान कलाकृतीच्या पूर्ण संपर्कातून येणारे समग्रावधान हे वैचारिक विदीर्णतेचे नसल्याने एकात्म असते. ही एकात्मता म्हणजेच माणसाच्या जगण्यात येऊ शकणारी परिपक्वता असते. आणि माणसांची मने ही क्षणोक्षणी एकमेकांवर परिणाम करत आणि या अर्थाने एकत्रितपणे जगत असल्याने हे जागतिक महत्त्वाचे कार्य असते. हेच कलेचे अत्युच्च महत्त्वाचे म्हणावे असे सांस्कृतिक कार्य असते. इथे विषमताहीन असा क्षण माणसाच्या प्रत्यक्ष जगण्यात अवतरतो. पण विशेष म्हणजे, तथाकथित विषमताविरोधी, परिवर्तनवादी लोकच हा सांस्कृतिक क्षण निर्माण करणाऱ्या कलाकृतींना कडाडून विरोध करताना दिसतात !

मराठी सांस्कृतिक पर्यावरणातला हा प्रचंड आंतरविरोध आहे ! दुर्घटनास्वरूप आणि हास्यास्पदही !

‘ काही विचारसरणीवाले आता तुमच्यावर हल्ला करतील ‘ – या कॉमेंटवर --

अमर होण्याची एक अंधुक संधी दिसतेय मला यात !

प्रत्येकाची वेगवेगळी अवस्था. त्यामुळे अलगता.

तुमच्या प्रश्नांची उत्तरे मूळ नोटमध्ये आहेत. भूमिका आणि पूर्वग्रह एकच. भूमिका नसते तेव्हाच सृजन असते, हे वरील नोटमध्ये मांडलेले आहे. त्याचे स्पष्टीकरणही आहे.

स्थितिशील विचार म्हणजे सृजन नव्हे. कला म्हणजे भूमिकांची आणि विचारांची कौशल्यपूर्ण देवाणघेवाण, हा भ्रम प्रचंड प्रमाणात पसरलेला असल्याने मराठीतले सांस्कृतिक क्षेत्र मृत्युपंथाला लागलेले आहे. ज्ञानेश्वर कोणती वैचारिक भूमिका मांडण्यासाठी लिहीत होते ? की ते स्वैर लिहीत होते ? त्यांनी केलेले भगवद्गीतेचे ' रसग्रहण ' हे सहांपैकी एका आंधळ्याने केलेले असेच तुम्हाला वाटते का ?

नुसत्या एका वैचारिक भूमिकेच्या देवाणघेवाणीला ज्ञानेश्वरांनी ' परतत्त्वाचा स्पर्श ' म्हटले ?

तुकाराम म्हणतो,

कोणाकारणें हें जालेंसें निर्माण । देवाचे कारण देव जाणे ।।

या विश्वनिर्मितीचा हेतू मानवी विचाराच्या कक्षेत येऊ शकत नाही, हाच याचा अर्थ.

संकल्प म्हणजे, आता नाटक लिहिण्यासाठी कागद, पेन टेबलावर घेतले आहेत, असा.

फलाशा न धरता कर्म म्हणजे बाणच घेऊ नको, नेमच धरू नको, असा अर्थ नाही. अनेक ग्रेट कलाकृती आपल्याला बहाल करून गेलेले लेखक ' भूमिकाबाजी ' नाकारतात, हे दुर्लक्षिता येणार नाही.

धन्यवाद ! ( तुम्ही माझ्या बाबतीत वापरलेला ' भूमिका ' हा शब्द उपरोधिक नाही, हे गृहीत धरतो आहे. )

## <u>देवाला निवृत्ती ?</u>

विचाराला विचार म्हणा की त्याचे उदात्तीकरण करून त्याला ‘ विवेक ‘ म्हणा, विभाजन करणे, तुकडे करणे हेच काम तो करत राहतो. कारण, माझा विचार, तुमचा विचार, माझा विवेक, तुमचा विवेक हे वेगवेगळेच असतात. माझ्या मेंदूत स्रवणारे न्यूरोप्सीन तुमच्यापेक्षा जास्त असल्याने माझ्या जगण्यात तुमच्यापेक्षा जास्त ताणतणाव, चिंता, भीती, उदासीनता हे तयार होतात. त्यामुळे माझा दृष्टिकोण तुमच्यासारखा असूच शकत नाही. शिवाय परिस्थिती, संस्कार ( परिणाम ) हीही कारणे या वेगळेपणात भर टाकतच असतात. विचार हा मर्यादित आणि संघर्षमय असल्यामुळे आपले स्वतःचे मन तर विदीर्ण होतेच, पण आपले वागणेही या विदीर्णतेतून आल्याने विदीर्णतेलाच प्रसवणारे होत राहते आणि सगळ्यांचे असेच होत असल्याने समाज, मानवजात अधिकाधिक विदीर्ण होत राहते. ताण, दुःख, छळ भोगत राहते. हे लक्षात आल्याने धर्मांनी, संतांनी जगण्याची दुसरी काही पद्धत आहे का याचा शोध घेतला. अभिव्यक्तीतले फरक सोडले तर हा एकात्मतेचा शोध होता असे दिसते. ‘ एकविध मन ‘ हे धर्माचे सारच तुकारामाने सांगितलेले दिसते. कुणाच्याही जगण्यात येऊ शकणाऱ्या या एकविधतेला – एकात्मतेलाच तो देव म्हणतो असे दिसून येते.

‘ तुका म्हणे अवघे जालें एकमय ‘ -- असे खूप आहे. हे काहीही लक्षात न घेता आपले काही सांस्कृतिक नेते ‘ देवाला निवृत्त करा ‘ असा संदेश देत फिरत असतात. त्या नासमझ ‘ विवेकी ‘ लोकांना हे कळत नाही की अशाने आपण मूल्याची शक्यताच नाकारत असून भ्रष्टाचार, खून, बलात्कार, छळ यांचे समर्थन करत आहोत. त्यांना नुसती मूर्तिपूजा नाकारायची असेल, त्यातून येणारी बुवाबाजी नाकारायची असेल तर तसे त्यांनी स्पष्ट

करायला हवे. ‘ देव ‘ म्हणजे काय हे त्यांच्यापेक्षा इथे खूप लोकांना अधिक चांगले समजत असण्याची शक्यता आहे. त्यामुळे, एकात्मतेच्या जागी विदीर्णतेला देवत्व देऊ पाहणाऱ्या अशा या सांस्कृतिक नेत्यांना, त्यांना दिल्या गेलेल्या नेतृत्वाच्या पदावरून तातडीने निवृत्त करणे हेच सर्वांच्या सर्वांगीण हिताचे होईल, हे स्पष्ट आहे.

' मानणे ' नव्हे, जगण्यात एकात्मता ' असणे ' हे मूल्य. त्यामुळे आस्तिक -नास्तिक हे सगळे विचारवालेच. विचार म्हणजे विदीर्णता आणि विदीर्णता हे मूल्य असू शकत नाही. विचार हेच मूल्य मानणे म्हणजे विदीर्णता हेच मूल्य मानणे. याचाच अर्थ विदीर्णतेतून येणाऱ्या भ्रष्टाचार वगैरे कृतींचे समर्थन करणे / त्या कृती स्वीकारणे / त्यांना मान्यता देणे.
कृष्णजी, मूल्य म्हणजे एक प्रकारचा विचार करण्याकडे असलेला कल, असे कुठेही म्हटलेले नाही, हे लक्षात घेतले तर गुंता कमी होईल.
' अविभक्तपणा ' किंवा ' एकविध मन ' याचा अर्थ विभक्तपणाच्या किंवा विदीर्णतेच्या भाषेत स्पष्ट करा, असे म्हणणे हे ' विचारा ' च्या क्षेत्रातही ' अतार्किक ' ठरेल. जे काय असेल ते वैचारिकच असते, असा निष्कर्ष काढलेला असणे, हे शोधाला नकार देणेच आहे. विचार वा विवेक यातली गोची लक्षात येण्यातच सगळा अर्थ दडलेला असू शकेल.

ज्ञानेश्वर, तुकाराम यांनी मन, विचार, अनुभव, भाषा न वापरता ओव्या, अभंग लिहिले असे कोण म्हणेल ? एकात्मतेच्या भानासह हे सगळे असणे आणि विदीर्णता हेच निष्कर्षरूप सत्य मानणे, यांतला फरक पाहिला पाहिजे. विदीर्णतेला निष्कर्षरूप देवत्व देऊन शोध थांबवणे, इतरांनीही तसेच करणे शहाणपणाचे हॉईल असा मूर्ख प्रचार करणे, हे निश्चितच घातक आहे.

हे सगळे कसे निर्माण झाले तो विषय सोडून देऊ. काहीच नसण्यातून हे सगळे आले म्हणावे तर सुरुवातीलाच ' विचार ' गचकेल. विचार बंद पाडावे, असे म्हटलेले नाही. एकात्म भानासह सगळे असणे आणि विदीर्णता हेच अंतिम सत्य मानणे, यात फरक आहे. अपमान, सूड, युद्ध, दुःख हेच सगळे ' असणे ' आहे आणि यात ' स्व ' नाही हे मला एक तर वदतो व्याघाताचे दिसते आणि यालाच मूल्यात्म म्हणायचे म्हणजे रोगाने तडफडणाऱ्यालाच आनंदी माणूस म्हणा, असे म्हणणे वाटते. विश्वात हजारो जीव, वनस्पती, प्राणी, वगैरे आहेत, ती विदीर्णता नाही. विदीर्णता ही मानवी मनाची स्पेशालिटी आहे. यात उलटा प्रवास, सुलटा प्रवास असे काही नाही. खूप रोग लागले आहेत, आता उलटा प्रवास करून बरे कशाला व्हा असे कुणी म्हणत नाही. ज्यांना आहे हेच समाधानकारक वाटते आणि चाललेला तथाकथित सुलटा प्रवास उत्तम वाटतोय, त्यांचा प्रश्न नाही. असमाधान असल्याशिवाय कुणी शोधाला प्रवृत्त होत नाही. शोधाचे सुरुवातीचे माध्यमच विचाराने येणारे असमाधान हेच असणार. विचाराच्या मर्यादा प्रत्यक्ष दिसल्यावरच इतर काही शक्यता येईल. महान मौल्यवान कलाकृती माणसाला एकात्म अवधानाची जाणीव देतात असे मला दिसते.

कॉमेंटस लिहून वा वाचून कसेही सहभागी झालेले फ्रेंडस, धन्यवाद. कुणीतरी कुणालातरी काहीतरी पटवण्यातच इथल्या चर्चांचा शेवट व्हावा, असे काही नाही. आपल्या समोरच्या विषयांवर आपण एकमेकांशी बोलणे, हाही आपल्या जगण्याचा भाग असणे, हेही ठीकच.
डायसजी ( उच्चार बरोबर आहे ना ? ), धन्यवाद !

‘ सत्य ‘ असे काही असलेच तर ते समावेशक -- एकात्म असेल आणि विचार मर्यादित असल्याने विचारात सत्य असू शकत नाही, हे, या आणि आधीच्याही नोटसमधून मांडून झालेले आहे. यावर कुणाचे काही म्हणणे नाही. विचारानेच एवढे लक्षात घेणे अवघड नसावे. त्यामुळे, देवाची भक्ती करणाऱ्याला ‘ देवभोळा ‘ म्हणायचे आणि विचाराची भक्ती करणाऱ्याला विचारवंत म्हणायचे, हे चुकीचे ठरते. विचारभक्तालाही ‘ विचारभोळा ‘ म्हटले पाहिजे. आपल्याला न पटणारे कुणी काही बोलले की लगेच त्याला ‘ फतवा ‘ म्हणण्यात अर्थ नाही. भ्रष्टाचारी मंत्र्याला काढून टाका, खून करणाऱ्याला फाशी द्या, वगैरेंना, अजून तरी कुणी फतवे म्हणत नाही. तेंडुलकर कुणाला गोळी घालतो म्हणाले की ते तसे का बोलताहेत हे समजून घ्या, त्यांचा सात्त्विक संताप समजून घ्या, असे म्हणायचे पण तीच सवलत आणि सहानुभूती आपल्याला न पटणारे बोलणाऱ्याला ठेवायची नाही, ही विचारभोळ्यांची खासियतच असते. एकात्म सत्याचा क्षण आयुष्यात न आलेले देवभोळे आणि विचारभोळे यांच्यात कोणताही मूल्यात्मक फरक नाही. फरक करायचाच झाला तर, देवभोळे लोक तुकाराम-ज्ञानेश्वरांच्या संपर्कात तरी येत असल्याने त्यांना एकात्मतेची शक्यता तरी मान्य असते, विचारभोळ्यांच्या बाबतीत त्या शक्यतेचाही अभाव असतो. त्यामुळे त्यातल्या त्यात देवभोळे कमी घातक असे म्हणता येते.

१.‘ तुम्हीही विचारच वापरता / मांडता ‘ याचे स्पष्टीकरण वर आलेले आहे.
२. अहो, मी एका ‘ निवृत्त ‘ कर्मचारी संघटनेचा साधा सभासद आहे. त्या संघटनेतले कुणी ही आपली चर्चा वाचतही नाहीत. बाकी इतर कुठले कार्यकर्ते, सैन्य वगैरे माझ्याकडे नाही. मी एक सिंगल, निहत्ता माणूस ‘ विचार ‘ मांडतो आहे. त्यामुळे, मी फतवा काढला आहे अशी अफवा जरी पसरली तरी कुणीही भिण्याची शक्यता नाही. तिथेच अडकून बसायला नको.
३. ‘ विचारक्षम ‘ हा शब्द चुकीचा होईल. विचारक्षम माणसे देवभोळ्यांतही असतात. शास्त्रज्ञ, वकील, डॉक्टर्स, तत्त्वज्ञ, राजकारणी हे विचारक्षम नसतात असे कसे म्हणता येईल ? भारताच्या आयुष्यातल्या एका महत्त्वाच्या क्षणी इंदिरा गांधी यांनी जे. कृष्णमूर्ती यांच्याशी ‘ चर्चा ‘ केली होती. ते विचारक्षमच होते. तसे ते असल्याशिवाय जगातले मोठमोठे शास्त्रज्ञ, कलावंत, तत्त्वज्ञ त्यांच्याकडे चर्चा करायला येत नव्हते. ज्ञानेश्वर, तुकाराम विचारक्षम नव्हते ? त्यामुळे, ‘ विचार ‘ हेच सर्वस्व मानणाऱ्यांना ‘ विचारभोळे ‘ हाच शब्द योग्य आहे. यात हिणवण्याचा भाग नाही, फक्त योग्य शब्द वापरणे आहे. ‘ विचार हेच सर्वस्व मानणारे ‘ हे अधोरेखित घ्यावे.
४. ‘ कळप ‘, ‘ मूढपणा ‘ हे सगळीकडेच असू शकते. विचारभोळ्यांचे कळप नसतात, त्यांच्यात मूढपणा नसतो असे काही नाही. आणि व्यक्तींची मूढ, शहाणे अशी विभागणी करून फाटे फोडण्यापेक्षा दोन्ही बाजूंच्या ‘ चांगल्या ‘ शक्यता समोर ठेवून बोलणे विषयाला धरून होईल. ‘ खतपाणी घालणे ‘ वगैरे शब्द वापरताना आपण आधीच काहीतरी गृहीत धरतो, ते योग्य नाही.
५. तुम्ही इंग्लिश स्पेलिंगचे मराठी का लिहिताय ? एक तर तुमचे विचार समजून घ्या आणि त्यात हे स्पेलिंग ! माझ्या भोळेपणाची टेस्टच लागतेय !

**<u>त्वचारंग ( वर्ण ), बुद्धी, श्रद्धा, विचारसरणी.</u>**

माणसाच्या त्वचेचा रंग ( वर्ण आणि चातुर्वर्ण्य यांचा घोळ नको. ) हा त्वचेखाली असणारे मेलॅनिन हे द्रव्य आणि त्वचेवर होणारा सूर्यप्रकाशाचा परिणाम यांवर अवलंबून असतो. यांच्या कमीजास्तपणामुळे काळ्यापासून गोऱ्या वा पांढऱ्यापर्यंत त्वचेच्या वेगवेगळ्या छटा तयार होतात, हे आता शास्त्रसिद्ध आणि सर्वमान्य आहे. रंगावरून माणसाचे श्रेष्ठत्व वा कनिष्ठत्व ठरत नाही, हेही आता ( काहीजणांच्या बाबतीत तोंडदेखले असू शकेल. ) सर्वमान्य आहे. याच पद्धतीने खालील काही संशोधनांचा आपल्यावर काय परिणाम होऊ शकेल, याची कल्पना करणेही इंटरेस्टिंग ठरावे.

१.	बुद्धीचे कमीजास्त असणे, तिचा स्तर वरचा-खालचा  ( उच्च-नीच नको. ) असणे हे माणसाच्या जनुकरचनेवर अवलंबून असते असे संशोधन आहे. समाजाचा ऍव्हरेज ( सरासरी ) बुद्धिस्तर खालावला तर आत्तापर्यंत झालेली भौतिक, सांस्कृतिक प्रगती टिकवणे जमणार नाही, हे लक्षात घेऊन समाजातल्या विविध गटांतली जनुकदृष्ट्या सक्षम मुले निवडून, त्यांच्यावर विशेष खर्च करून, त्यांच्या वाढीची काळजी घेणे आवश्यक आहे, अशीही एका संशोधकाची सूचना आहे.
२.	एका संशोधकाने देवजनुक शोधून काढला आहे. हा जनुक असलेल्या माणसांची देवावर श्रद्धा असते. स्वतःपलिकडचे अस्तित्व, तशा अस्तित्वाचे साक्षात्कार यांच्या खरेपणाबद्दल त्यांना शंकाच नसते. अशी माणसे आशावादी, अधिक चांगले आरोग्य असलेली आणि अधिक प्रजोत्पादन करणारी असतात, असे त्या संशोधकाचे निरीक्षण आहे.
३.	एक मानसशास्त्रज्ञ म्हणतो, It is impossible to discuss ideologies simply in terms of rational beliefs. Endorsement of these belief systems is determined very largely by genetic and hence philosophically irrelevant factors. न जाणो कोणत्या जनुकरचनेची माणसे कोणत्या प्रकारच्या विचारसरणीची असतात, तेही सापडून जाईल.

हे सगळे पाहता, बुद्धिप्रामाण्यवाद्यांनी सश्रद्धांची खिल्ली उडवणे, टर उडवणे आणि आपण बुद्धिनिष्ठ आहोत म्हणजेच अधिक बरोबर, अधिक श्रेष्ठ आहोत असे समजणे किंवा उलट, दोन्हीला कितपत अर्थ राहतो ? वर्णश्रेष्ठत्वाप्रमाणेच, बुद्धिनिष्ठाश्रेष्ठत्व आणि श्रद्धाश्रेष्ठत्व हेही निकालात काढायला नको का ? अमुक एका प्रकारच्या विचारसरणीचे असणे म्हणजे ‘ शहाणे ‘ असणे हे तरी टिकणारे आहे का ? काही संशोधन बाल्यावस्थेत असते आणि कोणतेच संशोधन अंतिम नसते, हे लक्षात घेऊनही,  समोरच्या संशोधनाच्या दिशा आणि शक्यता पाहता, आपणही थोडी कल्पनाशक्ती चालवायला काय हरकत आहे ?

हे सगळे एकमेकांना वगळूनच असते असे काही नाही. इंजिनियरही सश्रद्ध असू शकतो. प्रश्न तो नाही. बाकीचे योग्य, नॉर्मल असून त्या फरकामुळे श्रेष्ठ-कनिष्ठ होते का, हा प्रश्न आहे. जसे गोरा इंजिनियर आणि काळा इंजिनियर यांत गोरा श्रेष्ठ असतो का, असे बघा.
नवीन एलेमेंटस न वाढवता वस्तुनिष्ठपणे या विषयाकडे पाहता येईल का, असा प्रश्न आहे. सश्रद्ध माणूस नुसती देवाची आठवण ठेवूनही काम करू शकेल. तो अमुकच करेल असे म्हणण्यात आपला अभिनिवेष येत असेल आणि बाजू लढवण्याचा प्रयत्न होत असेल तर, या चर्चेच्या स्पिरिटला धरून ते होणार नाही. सश्रद्ध माणसाने किंवा कुणीही काय करावे, काय करू नये, असे विषय निघाले तर मूळ विषय बाजूला पडेल.
म्हणजे, गिरीश, नेमकी जनुकरचना कशी ' हवी ' हे समजले की एका इंजेक्शनने गांधीवादी वा मार्क्सवादी माणसाचे रूपांतर हिंदुत्ववादी माणसात करता येईल ! ब्रेनवॉशिंगसाठी लागणारा वेळ, परिश्रम, पैसा हे सगळे खूपच वाचेल ! आणि ' पूर्वी ' लोक विचारसरणीचे गर्व बाळगत फिरत असत हे समजल्यावर भविष्यातली मुले खो खो हसतील !

मला हवी असलेली माहिती मी निरनिराळ्या माध्यमांतून मिळवतो. यातले काही इंटरनेटवरही उपलब्ध आहे. असो.
सुमारे चाळीस वर्षांपूर्वीचा, आता द्रष्टा म्हणावा असा, अमेरिकन कवी पीटर शेल्डाल याची खालील कविता इथे प्रस्तुत ठरावी --

माझे आयुष्य राहत आलेले आहे कंटाळवाणे

गोंधळलेले आणि कधीकधी अत्यंत घृणास्पद

आणि उद्रेकमय

परंतु, मी कधीच काहीच उच्चारलेले नाही मुद्दाम ,

अतिशय प्रामाणिकपणाशिवाय.

माझे स्वतःशीच असणारे मतभेद म्हणजे

असतात गैरसमज

एका बधीर आशावादाने पेललेले.

बहुधा मी बाळगत नाही माझी मते

काही तासांहून अधिक काळ.

वरील अनुवाद मी केलेला आहे. या कवीबद्दल मला उत्सुकता आहे. त्याची माहिती / लेखन यांबद्दल कुणाला काही सापडल्यास कळवावे.

श्रद्धेचा संबंध न आणता एकाग्रता, आत्मविश्वास आणि शक्ती यांच्यात वाढ करण्यासाठी काहीजण ' आत्मसंमोहन ' हे पूर्णतः भौतिक साधन वापरतात असे दिसते.
माझे एक मित्र म्हणाले, भौतिक साधन असेल तर आत्म्याचा वासही नसावा, आत्मानुभूतीपेक्षा स्वानुभव कधीही जास्त चांगला. बरोबर आहे, आत्मसंमोहनापेक्षा स्वसंमोहन म्हणणेच योग्य होईल.

कोण कुणाच्या म्हणण्याला कितपत महत्त्व देईल हा एक भाग झाला. तो असायचा तसा चालुच आहे. समोर असलेल्या संशोधनाकडे कसे पाहता येईल, असेही या चर्चेत अपेक्षित आहे. उदा. सश्रद्धाला फरक पडेल न पडेल, इतरांच्या दृष्टिकोणात काय, कसा फरक पडू शकेल, हेही.

पूर्ण मान्य. फक्त, दिवसा का असेना, डावा असलेला माणूस जेकेंना उद्धृत करेल का, मला शंका वाटते. आणि जेके स्वतःच ' अधिकारवाणी ' नाकारत होते तर त्यांना उद्धृत करणाऱ्याचा काय प्रश्न ! तुम्ही दिलेल्या तिन्ही विभागांत गोंधळच असण्याची शक्यता आहे
( मीही त्यातच कुठेतरी असू शकेन ). माझी नोट आणि इतर वक्तव्येही हे सुचवतील असे वाटते. शेल्डालसारखा कवीही ' सत्य ' च आहे पण ' गोंधळलेला ' ही आहे. ती एक वेगळीच ' खरी ' मनःस्थिती आहे. दूषणे देणे सोडून, क्षणभर, ही सगळी वस्तुस्थिती समोर आल्यावर आपण, कल्पना वापरूनही, वाटल्यास विनोदानेही, काय बोलु, हे उद्बोधक होऊ शकेल, या विचाराने केलेला हा उद्योग !

मी माझ्या व्यक्तिगत फायद्यातोट्यांवर एक डोळा ठेवून लिहीत असेन आणि त्यामुळे त्यात clashes of interests अध्याहृत असतील तर त्याला ' राजकीय ' म्हणता येईल. तसे असणे भागच असते, अशी एक ठाम प्रणाली बऱ्याच जणांना पटते, असे दिसते. ' महान ' कलाकृती ( जगन्मान्य

म्हटले तरी, व्याख्या आत्ता सोडून देऊ. ) या अर्थाने ' राजकीय ' नसतात, असे मला दिसते. अलिकडेच ' डिसग्रेस ' ही अनुवादित कादंबरी मी वाचली. त्या कादंबरीला कोणत्या अर्थाने ' राजकीय ' म्हणावे ? की 'राजकीय ' या शब्दाचा आणखी काही व्यापक अर्थ आहे ?

सौंदर्यदृष्टी आणि विषमतानाश यांत अग्रक्रम ठरवण्याची वेळ माणसावर येते, हे फार वाईट आहे. मित्रा, दोन्ही एकत्र येणे हा अत्यानंदच म्हणायला हवा !

एकच सध्या काय महत्त्वाचे वाटतेय ते ठरव आणि ते पूर्ण कर -- माझा मीच मलाच दिलेला सल्ला !

<u>आद्यता, सर्जकता आणि विद्वत्ता.</u>

‘ आद्यता ‘ हा शब्द originality साठी वापरू. त्यासाठी दुसरा समाधानकारक शब्द नाही, त्यातल्या त्यात हाच ठीक वाटतो. Creativity ला ‘ सर्जकता ‘ ठीक आहे. ‘ विद्वत्ते ‘ चा प्रश्न नाही.

व्यासांनी जग उष्टे करून टाकले, त्याचे एक दडपण आणि पाश्चात्यांनी तर व्यासांसकट सगळेच संपवून टाकलेले ! करण्यासारखे काही शिल्लकच नाही, अशी अवस्था ! असे आधीच लिहिले गेलेले आहे, असा विचार खूप सविस्तरपणे अमुक लेखकाने तिकडे वीस वर्षांपूर्वीच मांडलेला आहे, असे ऐकत ऐकत आयुष्य संपून जावे, अशी परिस्थिती ! म्हणजे इथे आद्यता आणि सर्जकता असलेले लोक नाहीतच की काय ! ही जाणीव विद्वत्ता असलेले लोक इथे सारखी इंजेक्ट करत राहतात. त्यांच्याकडे खूप माहिती असल्याने प्रत्येकालाच ते किडूकमिडूक करत राहतात.

चोरलेले, कॉपी मारलेले, थोडे बदल करून आपल्या नावावर खपवलेले, असले तर उघडकीला यायलाच हवे. पण स्वतंत्रपणेही दोन व्यक्तींना काही साम्य असलेल्या गोष्टी सुचू शकतात, हेही लक्षात घेतले पाहिजे. आणि असे ‘ साम्य ‘ हे ‘ जसेच्या तसे ‘ असण्याची शक्यता फार कमी. कारण ते नावीन्य, तो शोध हा आपापल्या जगण्यातून वेगवेगळ्या प्रक्रियेने दोघांनाही दिसलेला असतो. इथले, कलेवर, विद्वत्तेवर जगता न येणे, त्यामुळे खूप वेळ व शक्ती वेगळ्या, उपजीविकेच्या कामावर खर्च होणे, अशा काही कारणांमुळे खूप मोठे औपपत्तिक काम करणे इथे खूप अवघड जाणार, हे उघड आहे. आणि आता तर काळाचा रेटाही म्हणतोय, थोडक्यात बोला !

आद्यता आणि सर्जकता यांसाठी खात्रीच्या सवयी फेकून शोधाला वाव असण्याचे जगणे लागते. आपल्याकडेही असे जगणे असू शकते. त्याला इतर कूठल्या फारशा अटी व शर्ती नाहीत. आपणही ‘ सत्य ‘ च जगतो आहोत आणि आपल्या प्रक्रियाही मौल्यवान असू शकतात. आद्यतेची उगीचच चिंता न करता आपल्या कृती आपण निर्धास्तपणे करत राहणे, व्यक्त होत राहणे महत्त्वाचेच आहे. इथे प्रस्तुत वाटणारे एक उदधृत खाली देत आहे --

Even in literature and art, no man who bothers about originality will ever be original: whereas if you simply try to tell the truth (without caring two pence how often it has been told before) you will, nine times out of ten, become original without ever having noticed it.
--- C. S. Lewis

घ्या ! म्हणजे हेही तिकडे सांगून झालेले आहे !

राजेंद्रजी, धन्यवाद ! कृष्णजी आणि प्राचीनेही काही म्हटले आहे, प्रत्येक मुद्यावर नोट देणाऱ्यानेच बोलले पाहिजे असे काही नाही. चर्चा म्हणजे, कुणीतरी काहीतरी पटवत आहे, असे न घडले तर फार छान ! प्रणवला कुणाच्या एखाद्या मुद्याबद्दल काही सुचले तर त्याने बोलावे, असे मला वाटते. अर्थात उदाहरणार्थ.
धर्मवादी माणूस प्रामाणिकही असतो आणि निश्चितही असतो पण मानवी हिताच्या दृष्टीने फसवा असतो. सर्जकता म्हणजे नुसते नवे नव्हे, आकलनाची स्वतंत्र प्रक्रिया म्हणजे सर्जकता. ती फसवी नसते. प्रामाणिकपणा वा निश्चितपणा म्हणजे मूल्यात्मकता नव्हे, सर्जकता म्हणजे मूल्यात्मकता. धर्मवादासारख्या प्रामाणिक आणि निश्चित अशा सवयीच्या गोष्टी नाकारल्या गेल्याशिवाय सर्जकता अस्तित्वात येत नाही.

इथे recognition चा म्हणजे मान्यतेचा मुद्दासुद्धा यावा असे वाटते. जनरल पब्लिककडून मिळणारी मान्यता ही मुख्यतः त्यांना मिळणारी करमणूक या घटकावर अवलंबून असते. तीतून प्रसिद्धी, ग्लॅमर, पैसा हे सर्व मिळू शकते. पण मूल्यात्मक मान्यता ही अभ्यासू, विद्वान समीक्षकांकडून मिळते. पण एखाद्या भाषेत वेगवेगळ्या प्रकारचे समीक्षक उपलब्ध नसले, एखाद्या विचारसरणीच्या प्रभावाखालचेच समीक्षक उपलब्ध असले किंवा अभ्यासाच्या, विचाराच्या ओघात स्थितिशील झालेल्या मनाचे समीक्षक असले, नव्या सर्जक प्रक्रिया ते पाहू, समजू शकत नसले आणि नव्या सर्जकतेचे समीक्षक तयार झालेले नसले, तर त्या भाषेचे सांस्कृतिक अस्तित्व कसे असेल ? एकाच प्रकारची समीक्षा वर्षानुवर्षे फार मोठ्या प्रमाणावर हॅमर होत राहणे हे समकालीन सर्जकतेचे संपर्कमार्ग अडवत राहणे, बंद पाडत राहणे ठरणार नाही का ?
हे प्रश्न मराठीसाठी कितपत प्रस्तुत वाटतात ?

**<u>आजारपण आणि मन.</u>**

विमला ठकार यांचे मी फारसे काही वाचलेले नाही. क्वचित काही. त्यांनी दिलेली जे. कृष्णमूर्ती यांची एक आठवण, सोर्स १००% विश्वासार्ह असल्याने, इथे देत आहे.
" एका व्यक्तीला काही तरी आजार होता. आणि त्यांच्या चित्तामध्ये मोठा आक्रंद होता. त्या शारीरिक व्याधीचा जेवढा त्यांना त्रास नव्हता त्यापेक्षा जास्त त्यांचं चित्त आकुळ-व्याकुळ होत होतं. आणि त्यांचं, जे. कृष्णमूर्तींबरोबर काही बोलणं चाललं होतं. कृष्णमूर्तींनी, अगदी मोठ्या प्रेमानं, त्या जवळच बसलेल्या व्यक्तीचा हात हातात धरला आणि म्हणाले, Sir, why do you allow the illness to enter your mind ? The psychological suffering about the physical pain, takes place only when you allow the illness to enter your

mind and haunt it. Why do you allow it to haunt you, sir ?  ती त्यांची करुणेची नजर, आणि त्या करुणेनं उत्कट झालेला तो स्वर, आणि जवळजवळ त्यांच्या डोळ्यांत आलेले ते अश्रू ! हे मी प्रत्यक्ष पाहिलंय. “ ( ' आधार – पण आश्रय नव्हे ', पृष्ठ १२७. )
-- यातला  जेकेंनी विचारलेला प्रश्न कदाचित काहींना महत्त्वाचा ( आणि प्रसंगी प्रयोग करण्यायोग्यही ) वाटू शकेल म्हणून इथे शेअर केला आहे. सदर वाक्य जेकेंच्या कुठल्या पुस्तकातले नसल्याने आणि मला त्यांची सगळी वाक्ये ओळखता येतीलच अशी मुळीच खात्री नसल्याने सोर्सच्या विश्वासार्हतेचा उल्लेख केलेला आहे.

मराठीतल्या बकवास चित्रपटांपेक्षा हिंदी बकवास चित्रपटांवर पैसे खर्च केले तर करमणुकीचा परतावा तरी जास्त मिळतो !

अमर्यादितता असू शकत असेल तर मर्यादितता असू शकत नाही
आणि मर्यादितता असू शकत असेल तर अमर्यादितता असू शकत नाही.

<u>एकटेपणाचा शौक</u>

समजा एकटेपणाच्या शौकीन माणसाला दुसऱ्यांना न दुखवता जगायचे आहे, तर त्याला कोणते उपाय, मार्ग सुचवता येतील ? उदा. वेळेला तो उपयोगी पडू शकतो, अशी पार्श्वभूमी तयार करणे. आणखी ?

अनेकदा तो कंपनी देण्याच्या, दुसऱ्यांना इंटरेस्ट असलेल्या विषयांवर गप्पा मारण्याच्या, नातेवाईकांच्या, मित्रांच्या वादावादीत, भांडणांत करमणूक करून घेण्याच्या, गॉसिपमध्ये सहभागी होण्याच्या, अशा अनेक अपेक्षांना तो नकार देत असल्याने ते दुखावले जातात. हा प्रश्न अध्यात्मिक स्तरावर जाईल तेव्हा तो प्रश्नच नसेल कदाचित. सध्या फक्त व्यावहारिक असे काही सुचू शकते का, असा हा प्रश्न आहे. लाखे म्हणतात तसे, भानच नाही, ही शक्यता मला वाटत नाही. त्या बाबतीत त्याला भय नसेल, गैरसमज दूर करण्याचे प्रयत्न त्याच्या जगण्यात अनावश्यक असतील, हे शक्य असेल कदाचित.

मकरंदच्या म्हणण्याप्रमाणे दोन्ही डगरींवर पाय ठेवता येणार नाही आणि लाख्यांचे गर्दीतही एकटेपण टिकवणे, दोन्ही मिळून काही अर्थपूर्ण सूचित होतेय असे वाटते. ज्ञानदा, यात काल्पनिक काही नाही. संबंधातले घर्षण अनेक कारणांनी चालुच असते, त्यांतले हेही एक कारण असू शकते. संबंधांतली घर्षणाची असंख्य कारणे पाहता, सगळेच मॉब आणि मोनार्क हे दोन्ही रोल्स पार पाडत असतात. मतभेद, आवडीनिवडी, जगण्या-वागण्याच्या पद्धती या सगळ्या गोष्टी ' अकाल्पनिक ' जगात समजुतदारपणे, शांतपणे घेतल्या जातात ? चित्रा जोशी म्हणतात ते याच्या नकारार्थी उत्तराच्या खऱ्या परिस्थितीमुळे, असे दिसते.

अगदी ! तो ‘ मला ‘ कधी प्रॉब्लेम होतो हेच पाहणे महत्त्वाचे दिसते. एकटेपणाची आवड ही दुकटेपणाला प्रतिकार किंवा त्याचा तिरस्कार या स्वरूपात व्यक्त होते तेव्हा ते माझे मलाही त्रासदायक होते, इथेच या प्रश्नाची मेख असावी.

असे म्हटले की पुन्हा विशिष्ट आदर्श रचना, त्यांबाबतचे मतभेद या गोंधळात ' समजण्या ' ची शक्यता मावळत जाते. दुसऱ्यांनी हर्ट होणे न होणे याच्यावर कुणाचाही कंट्रोल असणार नाही. नाही तर खरे बोलणारे शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, धर्मसंस्थापक यांना शिक्षा देणे, मारून टाकणे हे घडले नसते. यातला ' आपला ' प्रश्न काय आहे आणि त्यातून बाहेर पडता येऊ शकेल का, हेच शेवटी ' समजून ' घेण्याचे उरेल असे दिसते.

--- 000 ----

मो. ९३७१००५७७३.

ईमेल – champrade@gmail.com

वेबसाईट -- www.champralekhan.com

--- ००० ---